# प्रकरण पहिले

# प्रस्तावना आणि संशोधन पध्दती

१.१ प्रस्तावना

१.२ अन्नप्रक्रिया उद्योग

१.३ अन्नप्रक्रिया उद्योगाचे प्रकार

१.३.१ मसाले

१.३.२ फळप्रक्रिया

१.३.३ दुग्ध प्रक्रिया

१.३.४ शीतगृहे आणि गोदामे

१.३.५ अनुदान

१.३.६ प्रशिक्षण

१.४ भारतातील अन्नप्रक्रिया उद्योगाची स्थिती

१.५ अन्नप्रक्रिया उद्योगाची गरज

१.६ अन्नप्रक्रिया उद्योगात १००% विदेशी गुंतवणूक

१.७ अन्नप्रक्रिया उद्योगातून रोजगार

१.७.१ अन्नप्रक्रिया उद्योग आणि रोजगार संधी

१.८  सरकारच्या प्राधान्यक्रम क्षेत्रात सहभाग

१.९ पाचवर्षात  २२.५% वाढला डबाबंद पदार्थांवरील खर्च

१.१० औद्योगिक विकासातील महत्व

१.११ गुंतवणूक

१.१२ सांख्यिकी

१.१३ एफडीआय धोरण

१.१४ क्षेत्रीय धोरण

१.१५आर्थिक मदत

१.१६ आयकर खर्चात घट

१.१७ सेवा कर

१.१८ अनुकूल शुल्क

१.१९ अबकारी शुल्क

१.२० गुंतवणूक संधी

१.२१ खाद्यपदार्थ आणि पौष्टिकता

१.२२ संस्था

१.२३ अन्न प्रक्रिया उद्योगात कौशल्याचा अभाव

१.२४ संधी

१.२५ अन्नप्रक्रिया उदयानांची स्थापना

१.२६ पुरवठा श्रृंखलेच्या पायाभूत सुविधा

१.२७ राष्ट्रीय अन्नप्रक्रिया प्रकल्प (एनएमएफपी)

१.२९ जाहिरात उपक्रमांसाठी योजना

१.३० खाद्यप्रक्रिया उद्योगात लागू असलेल्या कायद्याची सूची

१.३१ खाद्यान्न सुरक्षा आणि मानक अधिनियम, २००६ नियम

१.३२ औदयोगिक क्षेत्राशी संबंधित संस्था

१.३२.१ राष्टीय अन्न तंत्रज्ञान संस्था आणि उदयमिता व व्यवस्थापन

१.३२.२ निफटेम (NIFTEM) चे प्रमुख उदिदष्टे

१.३२.३ भारतीय पीक प्रक्रिया आणि तंत्रज्ञान संस्था (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रॉप प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी) आयआयसीपीटी

१.३२.४ भारतीय द्राक्ष प्रक्रिया महासंघ (इंडियन ग्रेप प्रोसेसिंग बोर्ड)

१.३२.५ राष्ट्रीय मांस आणि कुकुटप्रक्रिया महासंघ (एनएमपीपीबी)

१.३२.६ कृषी आणि प्रक्रियाकृत अन्न निर्यात प्राधिकरण (एपीईडीए)

१.३३ मत्स्य व्यवसाय

१.३४ फळप्रक्रिया उद्योगाची उणीव

१.३५ अन्नप्रक्रिया उद्योग भूमिका व उद्दिष्टे

१.३६ महत्त्वाची धोरणे

१.३७ नियोजन योजना

१.३८ अन्नप्रक्रिया उद्योगावरील २०१५ मधील दृश्य

१.३९ अन्नप्रक्रिया उद्योगाचा क्षेत्रीय दृष्टीक्षेप

१.३९.१: फळे आणि भाजीपाला प्रक्रिया

१.३९.२ मांस आणि मांसप्रक्रिया

१.३९.३ मांस उत्पादन प्रक्रियेसाठी उत्पादन

१.४० औद्योगिक धोरण २०१३

१.४१ प्रोत्साहन पॅकेज (गठठा) योजना २०१३

१.४२ कृषी औदयोगिक मसुदा धोरण २०१०

१.४३ द्राक्षप्रक्रिया धोरण २००१

१.४४ राज्यांमार्फत अंमलबजावणीसाठी

१.४५ जाहिरात उपक्रमांसाठी योजना

१.४६ पात्र संघटना

१.४७ आर्थिक मंजुरी

१.४७.१ ठळक वैशिष्ट्ये

१.४७.२ विविकरणाची सुविधा

१.४७.३ पात्र क्षेत्रे

१.४८ आर्थिक अनुदान

१.४८.१ उद्दिष्टे

१.४८.२ पात्रता

१.४८.३ सहाय्याचे प्रमाण

१.४८.४ उद्देश

१.४८.५ योग्य संघटना उद्योग

१.४९ उद्योग संस्था / संघ

१.४९.१ पात्रता

१.४९.२ क्षेत्रीय धोरण

१.५० संशोधनाची उद्दिष्टे

१.५१ गृहितके

१.५२ अभ्यास विषयाची व्याप्ती

१.५३ माहितीचे संकलन

१.५४ माहितीचे पृथ्थकरण

१.५५ नमुना निवड

१.५६ कालखंड

१.५७ संख्याशास्त्रीय साधने

१.५८ संशोधनाचे महत्त्व

१.५९ सारांश

१.६० प्रकरणांची रूपरेषा

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना आणि संशोधन पध्दती

## १.१ प्रस्तावना

अन्नप्रक्रिया उद्योग हे भारतातील असा एकमेव उद्योग आहे की, ज्याचे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये निर्यातीत वाटा मोठया प्रमाणात आहे. निर्यात, उपभोग आणि विकासासाठी याचा मोठया प्रमाणात उपयोग होतो. यामधील महत्वाचे काही उपक्षेत्र म्हणजे फळे, भाजीपाला, मासेमारी, दुग्ध व्यवसाय, मटन कुक्कुट पालन, मद्य व्यवसाय, शीतपेय इ. उद्योगांचा अन्नप्रक्रिया उद्योगात महत्वाचा वाटा आहे. शेती क्षेत्राच्या उन्नतीसाठी भारत सरकार स्वातंत्र्यापासुन प्रयत्नशील आहे. त्यासाठी हरीतक्रांती, दुग्धक्रांती याव्दारे प्रयत्न केले. भारतीय अर्थव्यवस्थेच्या जलद विकासासाठी सरकारने कमाल जमीन धारणा कायदा अमलात आणून जास्तीत जास्त लोक शेतीमधुन भरपुर अन्न धान्य पिकवण्यासाठी कार्यरत व्हावे यादृष्टीने वाटचाल सुरु केली. त्यांच्याकडुन कडधान्ये, फळे, भाजीपाला, दुध, मत्सशेती, कुक्कुटपालन अशा वेगवेगळया पध्दतीने अतिशय पोषक अशा पिकांचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली. कारण अन्नप्रक्रिया उद्योगांना चालना मिळेल या अनुषंगाने हे कार्य घडत होते. या सर्व गोष्टींचा विचार करता या सर्वांचा उत्तम दाखला म्हणजे अन्नप्रक्रिया उद्योग होय.

आज आपण एका अशा उद्योगाकडे वळणार आहोत, ज्याच्याकडे भारताने मागील दशकापासुन विशेष लक्ष दयायला सुरुवात केली आहे. अजुनही या उद्योगाचा विकास भारतात म्हणावा तसा झाला नाही, त्यामुळे या उद्योगामध्ये देशाच्या प्रगतीसाठी मोठया प्रमाणात वाव आहे. या पदार्थावर प्रक्रिया करुन विविध प्रकारचे पदार्थ निर्माण करता येतात. या पदार्थांना प्रचंड मागणी असते. मात्र मुळ फळ किंवा शेती पदार्थापेक्षा प्रक्रिया करुन मुल्यवर्धन केलेल्या पदार्थाचे आर्थिक मुल्यही कित्येक पटीने वाढते. त्यामुळे अन्नप्रक्रिया उद्योगाकडे अधिक लक्ष देण्याची अवश्यकता आहे.

आपल्या भारतीय अर्थव्यवस्थेचे दोन मुलभुत मजबुत स्तंभ म्हणजे शेती व उद्योग होय. या दोन आधारभुत स्तंभामुळे भारतीय अर्थव्यवस्था मजबुत झाली आहे. तसेच उद्योग व अर्थव्यवस्था स्थिरीकरणासाठी, प्रगतीसाठी मागणी व पुरवठा हे दोन मुलभूत गरजांची आवश्यकता आहे. त्यासाठी वेगवेगळया उद्योगांची म्हणजे शेती आधारीत उद्योगांची स्थापना करणे गरजेचे आहे.

जेव्हा आपण तंदुरुस्त जीवन जगण्याची इच्छा बाळगतो तेव्हा आपल्या जेवणामध्ये उत्तम परिपक्व अशा अन्नपदार्थांचे सेवन असणे गरजेचे असते आणि ते चांगल्या प्रतिचे प्रक्रिया केलेले अन्न किंवा खाद्य असते, त्यावेळेस आपले आर्युमान वाढण्यास मदत होते.

अन्नप्रक्रिया उद्योग म्हणजे अन्नपदार्थावर प्रक्रिया करुन विविध पदार्थांची नव्या पद्धतीने निर्मिती करणे होय. या प्रक्रियेमध्ये विविध प्रकारचे डबा बंद प्रकारचे पदार्थ निर्माण केले जातात. यामध्ये विविध प्रकारची शीतपेये, चूर्ण, अंबवलेले पदार्थ आणि विविध प्रकारचे ठोस पदार्थ बनवता येतात.

दुग्धव्यवसाय, प्रक्रिया केलेले पदार्थ, शीतपेये, धान्यापासुनचे पदार्थ, मसाले, जाम, जेली, मीठ, डबाबंद पदार्थ, झटपट तयार होणारे पदार्थ, लोणचे, मुरंबा, आंब्याचे विविध पदार्थ यांसारखे कितीतरी व्यवसाय सुरु करण्यासाठी संधी उपलब्ध आहे. यामध्ये फळे, फुले, पालेभाज्या, चिकन, मटन, दुध, चॉकलेटस, सोयाचे पदार्थ, इ. उद्योगांचा समावेश होतो. या उद्योग ासाठी लागणारा कच्चा माल भारतामध्ये मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. त्याचबरोबर मनुष्यबळ आणि आधुनिक यंत्रसामग्री या साऱ्या गोष्टी आपल्यासाठी तसेच व्यवसायासाठी अनुकुल आहेत. अगदी लहान प्रमाणापासुन सुरु करुन कितीही मोठया प्रमाणापर्यंत हा उद्योग वाढवता येतो. या उद्योग ातून उत्पादित केलेल्या उत्पादनांना निर्यातीसाठीही सुवर्ण संधी आहेत. विविध प्रकारची उत्पादने एकत्र करून सुध्दा उत्तम प्रकारचे पदार्थ उत्पादित करू शकतो.

एकंदरीत अन्नप्रक्रिया हा एक अतिशय व्यापक आणि मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा व्यवसाय आहे. यामध्ये कोटयावधींची उलाढाल असणारा व्यवसाय निर्माण करणे शक्य आहे. उत्तम प्रशिक्षण, शासनाची वित्तीय मदत आणि वाढीसाठी पुष्कळ वाव आहे. या व्यवसायाचा आपल्या तरुणांनी सुवर्ण संधी म्हणून विचार करायला हवा.

अन्नप्रक्रिया उद्योगाच्या प्रगतीसाठी शेतकऱ्यांची निर्मिती ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. उद्योगाची प्रगती करत असताना शेतकऱ्यांचे देखील उत्थान होईल. भारताच्या पंतप्रधानांच्या दृष्टीकोनातून अन्न प्रक्रिया उद्योग हे २५ टक्के क्षेत्रांपैकी एक आहे. सरकार अन्नप्रक्रिया उद्योगास भरपूर महत्त्व देत आहे. केंद्रीय अंदाज पत्रकामध्ये २००० कोटी रूपये नाबार्डच्या अंतर्गत तयार केले गेले आहे, जेणेकरून खाद्य प्रक्रिया उद्योगाला स्वस्त पतपुरवठा केले जाऊ शकते. पॅकेजिंग (बांधणी) आणि प्रक्रियेसाठी सयंत्र आणि यंत्रावर अबकारी कर हा १० टक्क्यावरून ६ टक्क्यांवर आला आहे. व्यवसायातील सुलभतेसाठी नोंदणी प्रक्रिया ही सोपी केलेली आहे. अन्न प्रक्रिया मंत्रालयाकडून देशभर

१७ नवीन अन्न प्रक्रिया उद्योगांच्या उदयानांचे वाटप केले आहे. अलिकडच्या काळात अन्नप्रक्रिया उद्योग सर्वाधिक रोजगार निर्मिती करणारे म्हणून उद्योग उदयास आले आहे.

अन्नप्रक्रिया उद्योग असा उद्योग आहे की, शेती आणि इतर क्षेत्रांपेक्षा वेगाने वाढत असून तो ८.४ टक्के झ ााला आहे, आणि सर्वात जास्त रोजगार निर्मिती करणारे क्षेत्र आहे. गेल्या दशकात या क्षेत्रात (एफडीआय ) थेट परकीय गुतंवणूकीमध्ये १० % पेक्षा आधिक वाढ झाली आहे, यामुळे उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने अनेक पावले उचलली आहेत.

सोलापूर जिल्हयाचा या अनुषंगाने विचार करता, इतर जिल्हयांचा तुलनेत सोलापूर जिल्हयातील उद्योगांची स्थिती म्हणावी तितकीशी चांगली नाही, त्यातल्या त्यात अन्नप्रक्रिया उद्योगाची तर नाहीच, केवळ एक संधी म्हणुन सुध्दा याकडे पाहिले जात नाही. एक चांगल्या पध्दतीचा उद्योग जो की आर्थिकदृष्टया बळकट आहे, मात्र त्या दृष्टीकोनातून पाहिले जात नाही. कोणत्याही उद्योगाकडे जर बारकाईने पाहिल्यास तर तो उद्योग रोजगाराचे सामर्थ्य असलेला उद्योग दिसुन येईल आणि तो आपल्या अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्यास मदत होईल. अन्नप्रक्रिया उद्योग हे एक उत्तम व्यापाराचे साधन आहे असे म्हणता येईल. एक प्रभावी सामर्थ्य त्यामध्ये आहे. एखादा लघु उद्योगसुध्दा मोठया प्रमाणात रोजगार निर्मितीची क्षमता बाळगतो व वृध्दीसाठीही मदत करतो.

अन्न प्रक्रिया उद्योग ाचा विचार करता फक्त २.२ टक्के इतकेच अन्न किंवा खाद्य अथवा शेती उत्पादन प्रक्रियेसाठी येते. थोडक्यात २.२ टक्के वाटा अन्न प्रक्रिया उद्योग ाचा आहे, जे की भारतामध्ये मोठया प्रमाणात प्रक्रिया योग्य पदार्थाची नासाडी होत आहे, याचे महत्वाचे कारण म्हणजे प्रक्रियेचा अभाव आहे. तथापि आपल्या भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिक बाजारपेठ काबिज करण्याचे प्रचंड सामर्थ्य आहे, पण त्याचा पुरेपुर उपयोग केला जात नसल्याचे दिसून येते.

महाराष्ट्राबाबत विचार करता, राज्यात ३५ जिल्हे आहेत, जे की सुक्ष्म, लघु आणि मध्यम प्रकारच्या उद्योगांमध्ये विभागले गेले आहेत. काही ठिकाणी अशा अन्नप्रक्रिया उद्योगांची स्थिती चांगली आहे. पण तेथेही थोडया फार प्रमाणात सोई सुविधांचा अभाव जाणवतो. म्हणजेच भारतातील कोणत्याही कानाकोपऱ्यात अन्नप्रक्रिया उद्योग परिपूर्ण अणि आर्थिकदृष्टया सक्षम नसल्याचे दिसून येते. सोलापूर जिल्हयाचा विचार करता त्याहीपेक्षा बिकट परिस्थिती आहे. सोलापूर जिल्हयातील अन्नप्रक्रिया उद्योगांची, आर्थिक विषमता, शितीकरण, साठवणूक, वाहतूक, हंगामी शेती उत्पादन, अपुरी जलसिंचन व्यवस्था, इतर सोई सुविधा इत्यादीचा अभाव जाणवतो.

सोलापूर जिल्हायात एकूण २५३ अन्न प्रक्रिया उद्योग कार्यरत आहेत . याचे वर्गीकरण  पुढील तीन प्रकारात विभागले आहेत. १.सुक्ष्म, २.लघु, ३.मध्यम. हया तीनही प्रकारच्या घटकांमधील उद्योगांचा सामाजिक, आर्थिक, भौगलिक आणि ठराविक आर्थिक घटक या अनुषंगाने संशोधन करण्यात आलेले आहे. या उद्योगाच्या विकास आणि विस्तारासाठी काही घटकांमुळे यावर प्रतिकुल परिणाम झालेला दिसतो, त्यामुळे या प्रक्रिया उद्योगाला गौण स्थान मिळालेले आहे. पुरेशा प्रमाणात भांडवल निर्मितीचा अभाव, अकूशल कामगार अणि रोजगार निर्मिती हे घटक अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. संशोधनाच्या दृष्टीने औद्योगिक क्षेत्रातील आजारी उद्योगांचा अभ्यास  केला तर अन्नप्रक्रिया उद्योग हा घटक ठळकपणे समारे येतो. बदलत्या जागतिक व्यापारी बाजारपेठेच्या विश्लेषणाचा विचार करता या उद्योगांना पुनरुज्जीवन देणे काळाजी गरज  आहे.  हे पुनरुज्जीवन त्या उद्योगांच्या विकासासाठी पुढील काही सेवा सुविधा देणेही गरजेचा आहे.

- आवश्यक व गरजेची पिके
- शास्त्रीय दृष्टीकोन
- दळणवळण
- बाजारपेठेची माहिती
- जाहिरातीकरण

तसेच प्रमुख घटाकांविषयी माहिती आणि अर्थशास्त्रीयदृष्टया सर्वेक्षण करुन ज्या काही शासकीय योजना आहेत त्यांचे अवलोकन आणि अमंलबजावणी करणे, हया गोष्टी प्रक्रिया उद्योग ाच्या विकासासाठी महत्वाच्या आहेत. जर काळजीपुर्वक आणि कायदेशीर या गोष्टी आमलात आणल्या तर भविष्यात याचा चांगल्या पध्दतीने उपयोग करता येईल. या बरोबर सोलापूर जिल्हयातील अन्नप्रक्रिया उद्योग हा राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उत्तम स्थान प्राप्त करेल. तसेच अनुकुल बाजारपेठ मिळवुन संपुर्ण भारतात प्रक्रिया उद्योग ासाठी एक प्रकारची सकरात्मक बाजारपेठ तयार होईल. या पध्दतीने गेल्यास सोलापूर जिल्हयाच्या पुढील आर्थिक आणि सामाजिक वाटचालीस प्रगती मिळेल.

शेतीकडे एक उद्योग म्हणुन पाहण्याची गरज आहे, शेती अधिक फायदेशीर होऊन त्यावर अधारित उद्योग ांना चांगले पाठबळ मिळेल आणि त्यामुळे उद्योजकांना उभारी मिळू शकेल. आपल्या पूर्वजांनी पारंपारिक पध्दतीने शेती केली.  त्यातुन वर्षानुवर्षे आपला भारत देश सुजलाम सुफलाम राहील यासाठी भरपूर परिश्रमही घेतले, मात्र आता

सध्याच्या आधुनिक काळानुसार नवीन तंत्रज्ञानाची आणि संशोधनाची मदत घेऊन शेती करणे अधिक संयुक्तिक ठरणार आहे.

## १.२ अन्नप्रक्रिया उद्योग [१]

अन्नप्रक्रिया म्हणजे अन्नपदार्थावर प्रक्रिया करुन विविध पदार्थाची निर्मिती करणे. या प्रक्रियेमध्ये विविध प्रकारचे पदार्थ निर्माण केले जातात. यामध्ये विविध प्रकारची पेये, चुर्ण आणि विविध प्रकारचे ठोस पदार्थ बनवता येतात. दुग्धव्यवसाय, प्रक्रिया केलेले पदार्थ, शितपेये, धान्यापासुनचे पदार्थ, मसाले, जाम, जेली, मीठ, डबाबंद पदार्थ, झटपट तयार होणारे पदार्थ , लोणचे, मुरंबा, आब्यांचे विविध पदार्थ यासारखे कितीतरी व्यवसाय सुरु करण्यासाठी आज सुवर्ण संधी उपलब्ध आहे.

त्याशिवाय यामध्ये फळे, भाज्या, चिकन, मटन, दुध, चॉकलेटस, सोयाबिनचे पदार्थ, बंदिस्त पाणी बाटली इ. उद्योग व इतर अनेक उद्योगांचा समावेश यामध्ये होतो. या उद्योग ासाठी लागणारा कच्चा माल भारतामध्ये मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. त्याचबरोबर मनुष्यबळ आणि आधुनिक यंत्रसामग्री या साऱ्या गोष्टी आपल्याला व्यवसायासाठी अनुकुल आहेत. आपल्याला निर्यातीसाठी पण खुप मोठी संधी आहे.

## १.३ अन्नप्रक्रिया उद्योगाचे प्रक्रार

### १.३.१ मसाले

भारतीय मसाले प्राचीन काळापासुन प्रसिध्द आहेत. भारतीय मसाल्यांमध्ये जरी प्रसिध्द व्यापारी (ब्रॅण्ड) असले तरीही इतर लहान - मोठया अनेक मसाल्यांना उत्तम मागणी आहे. त्यामुळे मसाल्यांची विक्री आणि निर्यात हा एक उत्तम व्यवसाय आहे. त्याचप्रमाणे हळदीचा व्यवसाय सुध्दा खुप चांगला पर्याय आहे.

### १.३.२ फळप्रक्रिया

फळप्रक्रिया हा एक उत्तम व्यवसाय आहे. ज्यामध्ये कितीतरी प्रकारची उत्पादनांची निर्मिती करता येण शक्य आहे. यामध्ये आंब्यापासुन बनणारे आमरस, पाक, आंबेवडी तसेच सफरचंद, अननस, आंबा इ. फळांपासुन बनणारी शीतपेये प्रसिध्द आहेत. स्वत:चे व्यापारी नाव (ब्रॅण्ड) बनवुन या व्यवसायात उत्तम व्यवसाय निर्माण करता येईल.

### १.३.३ दुग्ध प्रक्रिया

भारतासारख्या देशात जिथे एकीकडे दुध दुभत्याची मुबलकता आहे. तर दुसरीकडे काही ठिकाणी दुधाची वानवा आहे. अशा ठिकाणी दुधाची भुकटी तसेच सुगंधी दुध, विविध माध्यमातुन प्रक्रिया केलेले दुध असे इतर अनेक प्रकारचे व्यवसाय करता येतील. भारतातुन अशा पदार्थाची खुप मोठया प्रमाणात निर्यात होते.

### १.३.४ शीतगृहे आणि गोदामे

प्रक्रियेबरोबरच उत्पादनांचे साठवणुक केंद्र हा सुध्दा उत्तम व्यवसाय आहे. फळे, भाज्या आणि मासे यांच्या साठवणुकीठी शीतगृहांची आवश्यकता आहे. तसेच ही उत्पादने वाहुन नेण्यासाठी शीत वाहतुक व्यवस्था हा सुध्दा एक उत्तम व्यवसाय आहे.

### १.३.५ अनुदान

अन्नप्रक्रिया उद्योग ासाठी अनेक प्रकारची अनुदाने आणि वित्त योजना उपलब्ध आहेत. यामध्ये अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या अनेक योजना आहेत. नाबार्ड या बँकेतर्फे अनेक प्रकारच्या कर्जाच्या योजना आहेत. सिडबी बँकेच्या अनेक योजना आहेत. अन्न प्रक्रिया उदयाने उभे करण्यासाठी अनेक विविध योजना शासनातर्फे राबविल्या जात आहेत, त्यामुळे या व्यवसायात येण्यासाठी वित्तीय मदत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### १.३.६ प्रशिक्षण

अन्नप्रक्रिया व्यवसायाचे प्रशिक्षण अनेक ठिकाणी उपलब्ध आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अन्न प्रक्रिया संस्थेतर्फे प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये बी.एससी. आणि एम.एससी. अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. असेच कोर्सेस मुंबई विद्यापीठातर्फे सुध्दा राबवले जातात. त्याचप्रमाणे दुग्ध प्रक्रिया आणि मत्स्य या विषयात अन्न प्रक्रियेसंबधी विविध अभ्यासक्रम करुन व्यवसाय सुरु कराण्याचे प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्यासाठी अनेक विविध अभ्यासक्रम उपलब्ध होतात. त्याच धर्तीवर एमएसएमई-डीआयसी असे अनेक अभ्यासक्रम राबवत आहे .

## १.४ भारतातील अन्नप्रक्रिया उद्योगाची स्थिती

शेतीकडे एक उद्योग म्हणुन  पाहिला जातो. शेतीला उद्योगाची जोड दिल्यास अधिक फायदेशीर होऊ शकतो, पूर्वजांनी केवळ पारंपारिक पध्दतीने शेती केली आणि त्यातुन वर्षानुवर्षे भारत सुजलाम सुफलाम राहिला आहे.  मात्र नवीन काळानुसार नवीन तंत्रज्ञानाची आणि संशोधनाची मदत घेऊन शेती करणे अधिक संयुक्तिक ठरणार आहे. अन्नप्रक्रिया उद्योग आज आपण अशा उद्योगाकडे वळणार आहेत. ज्याच्याकडे भारताने मागील दशकापासुन विशेष लक्ष द्यायला सुरुवात केली आहे. अजुनही या उद्योगाचा भारतात म्हणावा तसा विकास झालेला नाही. त्यामुळे या उद्योगामध्ये प्रचंड वाव आहे. या पदार्थावर प्रक्रिया करुन विविध प्रकारचे पदार्थ निर्माण करता येतात. या पदार्थांना प्रचंड मागणी  आहे, मात्र मुळ फळ किंवा शेती पदार्थापेक्षा प्रक्रिया करुन मुल्यवर्धन केलेल्या पदार्थाचे आर्थिक मुल्यही कित्येक पटीने वाढते. त्यामुळे अन्नप्रक्रिया उद्योगाकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अन्नप्रक्रिया उद्योग म्हणजे अन्नपदार्थावर प्रक्रिया करुन विविध पदार्थाची निर्मिती करणे होय. या प्रक्रियेमध्ये विविध प्रकारचे पदार्थ निर्माण केले जातात. यामध्ये विविध प्रकारची पेये, चुर्ण आणि विविध प्रकारचे ठोस पदार्थ बनवता येतात. दुग्धव्यवसाय, प्रक्रिया केलेले पदार्थ, शीतपेये, धान्यापासुनचे पदार्थ, मसाले, जाम, जेली, मीठ, डबाबंद पदार्थ, झटपट तयार होणारे पदार्थ, लोणचे, मुरंबा, आब्यांचे विविध पदार्थ यासारखे कितीतरी व्यवसाय सुरु करण्यासाठी संधी उपलब्ध आहे. तसेच फळे, भाज्या, चिकन, मटन, दुध, चॉकलेटस, सोयाचे पदार्थ या उद्योग ांचाही समावेश होतो. या उद्योग ासाठी लागणारा कच्चा माल भारतामध्ये मोठया प्रमाणात उपलब्ध आहे.

## १.५ अन्न प्रक्रिया उद्योगाची गरज

सरकारने आपले परकीय भांडवलाविषयीचे धोरण शिथील करताना अन्नप्रक्रिया उद्योगातही १०० % टक्के परदेशी गुंतवणूक करण्याची मुभा दिली आहे. त्यामुळे तशी गुंतवणूक झाल्यास देशात पुढील दहा वर्षात एक कोटी लोकांना रोजगार मिळू शकेल असा अंदाज एका वित्तीय संस्थेने व्यक्त केला आहे. सरकारने गेल्या काही दिवसांमध्ये रोजगार निर्मितीला चालना देणाऱ्या उद्योग ांवर भर दिला आहे.  वस्त्रोदयोग आणि अन्नप्रक्रिया उद्योग या दोन क्षेत्रामध्ये रोजगार निर्मितीची मोठी संधी आहे.

अमेरिकेत दुसऱ्या क्रमांकाची आर्थिक उलाढाल तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात होते आणि अन्नप्रक्रिया उद्योग ाबाबत तिसरा क्रमांक लागतो, यावरुन अमेरिकेतील अन्नप्रक्रिया उद्योग किती विशाल आणि व्यापक आहे याची कल्पना

यावरून येते. अमेरिकेला मिळणाऱ्या परकीय चलनामध्ये अन्नप्रक्रिया उद्योगाचा वाटा मोठा आहे. त्याच धर्तीवर भारतालाही अन्नप्रक्रिया उद्योग देशाच्या प्रगतीला हातभार लावणारा आणि प्रचंड प्रमाणावर रोजगार निर्मिती करणारा उद्योग ठरु शकतो. कारण अन्न प्रक्रिया उद्योगाचा आधार शेती हा आहे. देशातला शेतकरी कच्चामाल तयार करतो आणि कच्च्यामालावर प्रक्रिया करुन विविध प्रकारचे प्रक्रियायुक्त पदार्थ तयार केले जातात. त्यांच्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाची किंमत कमीच असते. परंतु त्याच्यापासुन पक्का माल तयार होतो तेव्हा त्या पक्क्यामालाची किंमत मात्र कच्च्यामालाच्या किमतीपेक्षा आधिक असते.

आपण जगाच्या बाजारात डाळिंब, द्राक्ष, आंबा, केळी अशी कितीतरी फळे निर्यात करत असतो आणि या फळांना परदेशातल्या बाजारांमध्ये देशी बाजारांपेक्षा चांगली किंमत येत असल्याने आपल्याला त्याचे कौतुकही वाटते. भारतातल्या कोणत्याही मार्केटमध्ये द्राक्षाला फार तर ६० रुपये प्रति किलो भाव मिळतो. परंतु हीच द्राक्षे मध्य पूर्वेकडील तेल उत्पादक देशात निर्यात केली तर, त्यांना ६० रुपयांच्या ऐवजी २०० रुपये भाव मिळतो. एकंदरीत फळांची निर्यात आपल्याला जास्त उत्पन्न मिळवून देते, परंतु ही फळे तशीच निर्यात न करता त्यांच्यावर प्रक्रिया करुन प्रक्रियायुक्त पदार्थ परदेशात पाठवले तर याच २०० रुपयांच्या ऐवजी २ हजार रुपये किंमत मिळु शकते. या मुल्यवर्धनाला आपल्या देशात म्हणावे तसे महत्त्व दिले जात नाही. त्यामुळे भारत हा ताजी फळे बाजारात विकणारा सर्वात मोठा देश ठरला आहे. इस्त्रायल, ब्राझील, अमेरिका या देशातही भरपुर फळांची निर्मिती होते. पण आता मोदींच्या सरकारने अन्न प्रक्रिया उद्योगातील परदेशी गुंतवणुकीला १०० टक्के अनुमती देऊन या परकीय चलन निर्मितीला चालना दिली आहे.

## १.६ अन्न प्रक्रिया उद्योगात १०० % विदेशी गुंतवणुक [२]

देशातील शेतकऱ्यांना अन्नप्रक्रिया उद्योगाशी जोडुन त्यांची आर्थिक प्रगती होण्यासाठी या क्षेत्रात १०० टक्के थेट विदेशी गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली आहे. कृषी आधारित अन्नप्रक्रिया उद्योगासाठी भारतात मोठया प्रमाणात संधी असुन याबाबत केंद्र सरकारने पुढाकार घेण्याची गरज आहे. अन्नप्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी एकुण ४२ अन्नप्रक्रिया उदयाने उभारण्याचे भारत सरकारचे ध्येय आहे.

या माध्यमातुन ५ हजार कोटींची गुंतवणुक आणि प्रत्येक अन्नप्रक्रिया उदयानामागे २५ ते ३० हजार शेतकऱ्यांना आर्थिक फायदा मिळू शकतो. याशिवाय प्रत्येक अन्नप्रक्रिया उदयानांमधुन ६ हजार लोकांना रोजगार

निर्माण होणार आहे. त्यामुळे अन्नप्रक्रिया उद्योगाला सकारात्मक दृष्टीकोन ठेवून चालना देण्याची गरज आहे. केवळ धोरणे निश्चित करून काही उपयोग नाही तर, त्यावर ठोस अंमलबजावणी करून प्रत्यक्ष कृती करण्याचीही गरज आहे. अन्नप्रक्रिया उद्योग ातील थेट परकीय गुंतवणूक पूढील प्रमाणे दर्शिवली आहे.

**कोष्टक १.१ अन्नप्रक्रिया उद्योग ातील थेट परकीय गुंतवणूक**

सन एप्रिल २००६-०७ ते मार्च २०१३-१४

| वर्ष | अन्नप्रक्रिया उद्योग ातील एकूण वार्षिक गुंतवणूक | | देशातील एकूण वार्षिक गुंतवणूक | | देशातील एकूण वार्षिक गुंतवणूकीतील अन्न प्रक्रिया उद्योग ाचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| | कोटींमध्ये | दशलक्षमध्ये | कोटींमध्ये | दशलक्षमध्ये | दशलक्षमध्ये |
| २००७-०८ | २७९.१ | ७०.१४ | ९८६४२ | २४५७५ | ०.२९ |
| २००८-०९ | ४५५.५९ | १०२.७१ | १४२८२९ | ३१३९६ | ०.३३ |
| २००९-१० | १३१४.२३ | २७८.८९ | १२३१२० | २५८३४ | १.०८ |
| २०१०-११ | ५५८.०३ | १८८.६७ | ९७३२० | २१३८३ | ०.८८ |
| २०११-१२ | ८२६.१६ | १७०.२१ | १६५१४६ | ३५१२१ | ०.४८ |
| २०१२-१३ | २१९३.६५ | ४०१.४६ | १२१९०७ | २२४२३ | १.७९ |

स्त्रोत : www.mofpi.nic.in

## १.७ अन्नप्रक्रिया उद्योगातुन रोजगार निर्मिती

कृषी क्षेत्रातील अर्थपुर्ण अशा उद्योगांनंतर आपण कृषी क्षेत्राच्या पुढील टप्पा म्हणजे अन्न प्रक्रिया उद्योग. अजुनही या उद्योगाचा भारतात पुरेसा विकास झालेला नाही. त्यामुळे या उद्योगामध्ये रोजगार निर्मितीसाठी प्रचंड वाव आहे. उत्पादीत झालेल्या नैसर्गिक पदार्थावर प्रक्रिया करुन विविध प्रकारचे खाद्यपदार्थ निर्माण करता येतात. या

पदार्थांना प्रचंड मागणी असते. तसेच मुळ फळ किंवा कृषी उत्पादनापेक्षा प्रक्रिया करुन मुल्यवर्धन केलेल्या पदार्थाचे आर्थिक मुल्यही पुढील बाजार विक्रीमध्ये कित्येक पटीने वाढते. त्यामुळे अन्नप्रक्रिया उद्योगाकडे तरुणांनी अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अन्नप्रक्रिया उद्योग हा एक स्वतंत्र उद्योग होऊ शकतो. तसेच साधनांच्या उपलब्धतेनुसार याची व्याप्ती लघु मध्यम किंवा मोठया स्तरावर करता येते. या उद्योगाकडे भारताने मागील दशकापासुन विशेष लक्ष द्यायला सुरुवात केली आहे. १००% टक्के परकीय गुंतवणुकीला परवानगी दिल्यानंतर त्यात आणखी वाढ होऊ शकते. दरवर्षी या उद्योगात एक लाखापेक्षा जास्त प्रशिक्षित व्यावसायिकांची आवश्यकता आहे. मात्र सध्या ही गरज निम्म्यावरच भागते ही वस्तुस्थिती आहे.

### १.७.१ अन्नप्रक्रिया उद्योग आणि रोजगार संधी

१) १०० टक्के परकीय गुंतवणुकीला परवानगी दिल्यानंतर त्यात आणखी वाढ होऊ शकते. असा अंदाज सीआयआयने (Confederation of Indian Industry) व्यक्त केला आहे.
२) दरवर्षी या उद्योगात एक लाखापेक्षा जास्त प्रशिक्षित व्यावसायिकांची आवश्यकता आहे. मात्र, सध्या ही गरज निम्म्यावरच भागते ही वस्तुस्थिती आहे.
३) सरकारच्या प्राध्यान्यक्रम क्षेत्रात सहभागी अन्नप्रक्रिया उद्योग सर्वात वेगाने वाढणाऱ्या उद्योगात समाविष्ट आहे.
४) गेल्या १५ वर्षात अन्न प्रक्रिया उद्योगात ६.७० अब्ज डॉलर विदेशी गुंतवणुक आली.
५) येत्या दहा वर्षात हा आकडा ३३ अब्ज डॉलर होण्याची शक्यता आहे.

## १.८ सरकारचा प्राधान्यक्रम क्षेत्रात सहभाग

अन्नप्रक्रिया उद्योग सर्वात वेगाने वाढणाऱ्या उद्योगात समाविष्ट आहे. गेल्या १५ वर्षात अन्न प्रक्रिया उद्योगात ६.७० अब्ज डॉलर विदेशी गुंतवणुक आली. येत्या दहा वर्षात या क्षेत्रात ९० लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. सरकार आणि खासगी क्षेत्रातील कंपन्यांव्यतिरिक्त या उद्योगात विद्यार्थ्यासाठी उद्यमशीलतेची शक्यताही अस्तित्वात आहे.

## १.९ पाचवर्षात २२.५ % वाढला डबाबंद पदार्थांवरील खर्च

देशात अन्नप्रक्रिया उद्योग वेगाने वाढ होण्यामागे डबाबंद अन्नपदार्थांवरील वाढता खर्च हे एक कारण आहे. सर्वेक्षणानुसार २०१० ते २०१५ दरम्यान पाच वर्षात देशात डबाबंद अन्नपदार्थांवर होणाऱ्या खर्चात २२.५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०१७ पर्यंत हा आकडा ३२ टक्के होण्याची शक्यता आहे.

## १.१० औद्योगिक विकासातील महत्व ३

ग्रामीण अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्र औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. भारतातील प्रमुख उद्योगांना लागणारा कच्चा माल पुरविणारा स्त्रोत म्हणुन शेती क्षेत्राकडे पाहिले जाते. कापड उद्योग, ताग उद्योग, साखर उद्योग, वनस्पती आणि मळे उद्योग यासारखे उद्योग प्रत्यक्ष शेतीवर अवलंबुन आहेत. इतर काही उद्योग अप्रत्यक्षपणे शेतीवरच अवलंबुन आहेत. ग्रामीण क्षेत्रातील हातमाग, विणकाम, तेल गाळणे, तांदुळ सडणे, कागद, साबण, तेल, यासारखे लघु व कुटीर उद्योग शेतीवरच अवलंबुन आहेत. त्यामुळे एकंदरीत देशाच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने ग्रामीण भागातील शेतीचे स्थान महत्त्वपुर्ण आहे. देशाच्या औद्योगिक विकासाचा पाया शेती व्यवसाय आहे. प्रा. कॉल्डर यांच्या मते औद्योगिक प्रगतीसाठी शेतीचा विकास ही पूर्व अट आहे.

अलीकडे भारतात शेतीवर अवलंबुन नसलेल्या उद्योगाची वाढ झाली आहे. मात्र औद्योगिक विकासातील शेतीचे महत्त्व फारसे कमी होत नाही. तसेच साखर उद्योग, कापड उद्योग असे व्यवसाय ग्रामीण भागात मोठया प्रमाणात निघत आहेत. कारण त्यांना लागणारा कच्चा माल ग्रामीण क्षेत्रातच मिळतो. या उद्योगांमुळे अनेक ग्रामीण भागाचा कायापालट होत असल्याचे दिसून येते . अलीकडे अन्न प्रक्रिया उद्योग वेगाने वाढत आहे. या उद्योगांना देशाच्या विकासाबरोबर ग्रामीण रोजगार निर्मितीला चालना मिळत आहे .

## १.११ गुंतवणूक

केळी, तेलघाणा, बियाणे, मटार, मिरची आणि कोरडे मिरपूड, आले, लिंबू आणि आंबा इ. शेती उत्पादनांनुसार २०१३ मध्ये जगात एक श्रीमंत कृषी संशोधन केंद्र म्हणून प्रथम क्रमांक पटकावला गेला आहे.

बाजरी, भेंडी, पपई, मांस, दुध, तूप, लोणी, तेल, तीळ, बियाणे, बडीशेप, कोंथिबीर, सोयाबीन, गोभी आणि फुलकोबी, ब्रोकोली, अंडी, लसूण, शेंगदाणे, मसूर, कांदा, वटाणे, हिरवी मटार, बटाटे यांच्या उत्पादनात भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

तांदूळ किंवा भात, करडई बियाणे, ऊस, चहा, टोमॅटो, गहू, शेळी मांस, दुधाचे पदार्थ, ताजे दूध, काजूच्या उत्पादनात भारताचा तिसरा क्रमांक आहे. त्यात शेंग, नारळ, आणि चिक्कोरी आणि वेलची इ.चा समावेश होतो.

देशभरात एकूण लागवडीखालील क्षेत्र ०१,९४,९,९९ हेक्टर असून १३९ % टक्के लागवडी खालील क्षेत्र आहे. २०१२ - १३ मध्ये निव्वळ सिंचित क्षेत्र ६६.१० दशलक्ष हेक्टर होते.

भारतात एकूण १२७ शेती हवामान क्षेत्राची ओळख पटली आहे. अन्न आयात करणाऱ्या देशांमधील धोरणात्मक भौगिलिक स्थान आणि निकटवर्तीय देशांकडे प्रक्रिया केलेले अन्न पदार्थ निर्यात करण्यासाठी भारत अनुकूल आहे.

अन्नप्रक्रिया प्रशिक्षण शैक्षणिक आणि संशोधन संस्थांचे विस्तृत जाळे २.३८ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणूकीसह ४२ मेगा अन्न प्रक्रिया उदयाने (एमएफपी) स्थापन केले जात आहेत. या उद्यानामध्ये सुमारे १२५० विकसित उद्योग ांसाठी मूलभूत सोयी आहेत. यामुळे अन्नप्रक्रिया आणि सहाय्यक युनिट स्थापन करण्यास उदयुक्त होवू शकतात. २५ जुलै २०१६ रोजी ४२ एमएफपी प्रकल्पांपैकी ८ प्रकल्प कार्यान्वित केले गेले आहेत. इतर देशांच्या तुलनेत कुशल मनुष्यबळाचा खर्च तुलनेने कमी आहे.

आकर्षक वित्तीय सवलती हया केंद्र आणि राज्य सरकारव्दारे पुरवठा केला जात आहे. त्यात भांडवल व त्यावर अनूदान, कर सवलत, अवमूल्यन लाभ तसेच प्रक्रिया केलेले अन्न पदार्थआणि यंत्रणांसाठी कमी शुल्क आणि उत्पादन शुल्कावर सवलत यांचाही समावेश आहे. भारतातील खाद्यान्न क्षेत्रातील प्रमुख जागतिक बाजारपेठ आधीच अस्तित्वात आहेत. पुरवठा साखळी आणि आधारभूत संरचना विकसित करण्यासाठी १३४ शीत साखळी प्रकल्प उभारले जात आहेत. २२ जुलै २०१६ रोजी १३४ शीतगृहे साखळी प्रकल्पांपैकी ८७ प्रकल्पपूर्ण झाले आहेत.

## १.१२ सांख्यिकी

२०१५ मध्ये अन्न प्रक्रिया उद्योगातील प्रमुख उद्योग म्हणजे धान्य दळण, साखर, खाद्यतेल, पेय, फळे आणि भाज्या प्रक्रिया व दुग्ध उत्पादने यामध्ये अन्नधान्य आणि अन्नपदार्थाच्या उत्पादनांच्या निर्यातीत भारत १२ व्या स्थानावर आहे.

१. २०१४-१५ मध्ये कडे खाद्य प्रक्रिया क्षेत्राचे योगदान २०११-१२ च्या किमंतीनुसार २२ अब्ज अमेरिकन डॉलर इतके निव्वळ मूल्य होते. (ग्रॉस व्हॅल्यू ॲडीशन) (जीव्हीए)
२. २०१४-१५ मध्ये उत्पादन क्षेत्रामधील अन्नप्रक्रिया क्षेत्राचा वाटा ८.६ टक्के होता.
३. नोंदणीकृत अन्नप्रक्रिया उद्योगातील स्थिर भांडवलात गुंतवूणक २०१२ -१३ मध्ये २४.५ अब्ज डॉलर्सने वाढून २०१३-१४ मध्ये २५ ॲब्ज डॉलर्सवर गेली आहे. यामुळे ६ टक्के २०१२-१३ मध्ये नोंदणीकृत अन्नप्रक्रिया उद्योगाची संख्या ३७,१७५ वरून २०१३-१४ मध्ये ३७,४४५ पर्यत वाढली आहे.
४. २०१३-१४ मध्ये सर्व नोंदणीकृत कारखान्यामध्ये उत्पन्न ११.६९ टक्के रोजगार देणारे अन्नप्रक्रिया उद्योग हे एक प्रमुख रोजगारात्मक क्षेत्रातील एक आहे.

## १.१३ एफडीआय धोरण

भारतातील उत्पादित खाद्य उत्पादनांच्या संदर्भा ई कॉमर्सच्या माध्यमातून व्यापार करणाऱ्या सरकारी मान्यता मार्गाने १०० टक्के एफडीआय परवानगी आहे.

## १.१४ क्षेत्रीय धोरण

२०११ मध्ये नवीन उत्पादन धोरणात अन्नप्रक्रिया उद्योगाला प्राधान्य क्षेत्र म्हणून ओळखले जाते. नामित अन्नप्रक्रिया उदयाने आणि व्यक्तीसाठी स्वस्त पत पुरवठा वाढवण्यासाठी सरकारने कृषी आणि ग्रामीण विकासासाठी राष्ट्रीय बँक (नाबार्ड) मध्ये अंदाजे ३०० दशलक्ष डॉलर्स एक विशेष निधी म्हणजे अन्नप्रक्रिया उद्योग निधी म्हणून तरतूद केली आहे. नियुक्त केलेल्या अन्नप्रक्रिया उदयानांमध्ये अन्नप्रक्रिया उद्योग घटकांना ३१ मे २०१६ रोजीच्या मुदतीपूर्वी एक तृतीयांश निधी १२ मेगा अन्नप्रक्रिया उदयाने प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने शेती व अन्नप्रक्रिया उद्योग घटकांना शीतीकरण साखळी वर्गीकृत केले आहे. बँकिंग प्रणालीकडून प्रति उधार घेण्यासाठी १५.३८ दशलक्ष डॉलर्सची मर्यादीत मंजूरी देण्यात आली आहे. यामुळे उद्योगजकांना अन्नप्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी आणि इतर क्षेत्रातील गुंतवणूकीला आकर्षित करण्यासाठी मोठया प्रमाणावर पतपुरवठा मिळेल.

## १.१५ अर्थिक मदत ४

रेल्वे , वाहने किंवा रस्त्यादवारे अन्नसामग्रीच्या वाहतूकीस सूट मर्यादित असेल तर भात व डाळी, पीठ, दूध, मीठ यासारख्या अन्नधान्य वाहतूकीला मर्यादीत केले आहे. कृषी उत्पादनांच्या वाहतूक कलम ९३/५ अंतर्गत जारी करण्यात आलेली आधिसूचना ३/२०१३ दिनांक १ मार्च २०१३ आणि दिनांक १ मार्च २०१५ पासून सुधारीत सेवा कर आधिसूचना क्रमांक २५/२०१२ सेवा कर अधिसूचना क्रमांक २५/२०१२ दिलेली आहे. वित्त कायदा, १९९४ सेवा करामधून सवलत देण्याची तरतूद आहे.

अधिक रोजगार निर्मितीसाठी, आयकर कायद्याच्या कलम ८ ओ जे जे ए ए च्या तुरतुदीनुसार किमान १०० कामगारांची पात्रता मर्यादा ५० % वरून कमी करण्यात आली आहे. (१ फेब्रुवारी ते १ एप्रिल २०१६) वित्त अधिनियम २००५ च्या सातव्या अनूसूचीमध्ये ५ टक्केपेक्षा अधिक अबकरी करावरील शुल्क लागू असलेल्या जल, खनिज पाण्याची आणि वायुगळती, ज्यामध्ये जोडलेली साखर किंवा इतर मधुर पदार्थ किंवा प्लेवडर्स या घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

## १.१६ आयकर खर्चात घट ५

गुंतवुणकीवर खर्च केलेल्या खर्चाची वसुली शक्य असल्यास कोणत्याही विशिष्ट व्यवसायासाठी (खाली दिलेल्या तपशीलासह) संपर्णआणि पूर्णपणे अनुमती असेल, तथापी ही कपात मागील वर्षातील गुंतवणूकीसाठी आणि त्याच्या कारभाराची सुरूवात होण्यापूर्वीच करण्याची अनुमती आहे.

व्यवसायासाठी १०० टक्के कपात केली गेली (प्रदान केली असेल तर करदात्याने किंवा त्याच्या व्यवसायात शेती श्रृंखला सुविधा उभारणे आणि कार्य करणे, यासाठी  तरतूद करण्यात आली आहे, युनिटच्या विस्तारासाठी उपलब्ध नाही.)

शेती उत्पादनांच्या साठवणीसाठी गोदांमाची उभारणी करणे व चालविणे (युनिटच्या विस्तारासाठी  उपलब्ध नाही) (आयकर कायदा १९/६ चे कलम ३६ ए) व्यवसायासाठी १०० टक्के कपात करण्याची अनुमती आहे.

१. मधमाशी पालन आणि मध उत्पादन.
२. साखर साठवणुकीसाठी गोदांमाच्या सुविधेसाठी उभारणी आणि कार्यान्वयन (इन्मकम टॅक्स कायदा १९६१ च्या कलम ३५ ए डी, जर गुंतवणकीवर खर्च झालेला असेल तर या गुंतवणकीच्या संपूर्णपणे उपयोग केला जाईल.)

लाभादवारे कर कमी करणे हे कर कार्यक्रमाच्या ऑपरेशनच्या पहिल्या पाच वर्षासाठी १०० टक्के कर सूट म्हणून उपलब्ध आहे.  त्यानंतर २५ टक्के नफा करमुक्त आहे, ३० टक्के कपंनीच्या बाबतीत हा लाभ केवळ नवीन युनिटससाठी लागू असेल.

उदा. विभाजन किंवा विद्यमान व्यवसायाच्या पुनर्बाधंणीदवारे तयार न केलेल्या.

भाज्या, मांस आणि मांसाचे उत्पादन, पोल्ट्री, सागरी क्षेत्रातील उत्पादन, संरक्षण आणि पॅकेजिंगसाठी उपलब्ध आहे. दुग्धजन्य उत्पादने प्रक्रिया केलेले असतील तर ते १ एप्रिल २००१ पासून किंवा नंतर सुरू झाले असेल तर (प्राप्तीकर अधिनियमाच्या १९६१ च्या कलम ८० आयबी, आयएलए अंतर्गत) त्या ठराविक उत्पादनांना आयकरातून सूट असेल.

जर १ एप्रिल २००९ नंतर मांस, मांस उत्पादने, पोल्ट्री , समुद्री उत्पादने किंवा दुग्ध उत्पादने संबंधित व्यवसाय सुरू झाला असेल तर उपरोक्त लाभ उपलब्ध होईल, परंतु १ एप्रिल २००९ पुर्वी अशा व्यवसायामध्ये काम करणाऱ्या उद्योग  संस्थांना याचा लाभ घेता येणार नाही. (प्राप्तीकर अधिनियमाच्या १९६१ च्या कलम ८० आयबी, आयएलए अंतर्गत)

## १.१७ सेवा कर

नकारात्मक सूची

नाकारात्मक सूचीमध्ये असलेल्या वस्तूंवर सेवा कर आकारला जाऊ शकत नाही. शेती, कापणी, मळणी, वाळविणे, स्वच्छता, ऊन दाखविणे, फिकट करणे, उपचार करणे, वर्गीकरण करणे, प्रतवारी करणे, शितीकरण अशा प्रकारचे प्रक्रिया ज्यामध्ये उद्योग ंच्या गरजेची वैशिष्टये बदलत नाही, अशा कृत्रिम शेतीला प्राधान्य दयावे. शेती उत्पादनांचा पण केवळ प्राथमिक बाजारपेठेसाठी तो विक्रीयोग्य बनवा.

खालील सेवा सवलत असणाऱ्या सेवा या सेवा कर अंतर्गत येतात.

अशा कारणास्तव शेती उत्पादनासाठी साठवणुकीशी संबंधित मूलभूत बांधकामांची बांधणी, उभारणी, कार्यान्वयन किंवा स्थापना करणे ज्यायोगे कशा कारणास्तव शीतीकरणाचा समावेश असेल. (सेवा कर अधिसूचना क्रमांक २५/२०१२, वित्त अधिनियम, १९९४ विभाग ९३ च्या कलम ९ अन्वये जारी केले अधिसूचना ३/२०१३. मार्च २०१३ आणि ६/२०१५ अनुसार सेवा करामधून सवलत मिळवण्याचा अधिकार आहे.)

शेतीसाठी अन्नधान्य हाताळणी यंत्रणा, यंत्रसामग्री किंवा उपकरणे, शेती उत्पादनांना मादक पेय वगळता खाद्यपदार्थ म्हणून वापरतात. (रेफरी सेवा कर अधिसूचना क्रमांक २५/२०१२, वित्त अधिनियम, १९९४- ९४९ विभाग ९३ च्या कलम ९ अन्वये जारी केले अधिसूचना ३/२०१३. मार्च २०१३ आणि ६/२०१५ अनुसार सेवा करामधून सवलत मिळवण्याचा अधिकार आहे.)

शेती उत्पादनाची साठवणूक किंवा गोदामाची सेवा. (सेवा कर अधिसूचना क्रमांक २५/२०१२, वित्त अधिनियम, १९९४ विभाग ९३ च्या कलम ९ अन्वये जारी केले अधिसूचना ३/२०१३. मार्च २०१३ आणि ६/२०१५ अनुसार सेवा करामधून सवलत मिळवण्याचा अधिकार आहे.)

फळे आणि भाज्यांच्या पाकीटावर शिक्का मारणे (सेवा कर नोटिफिकेशन क्रमांक २५/२०१२) वित्त कायदा, १९९४ कलम ९३ अध्याय-५ अंतर्गत जारी करण्यात आलेली सेवा कर दिनांक २० मार्च २०१२ रोजी अधिसूचन ३/२०१३. १ मार्च २०१३ आणि ६ मार्च २०१५ पासून सेवा करामधून सवलत मिळवण्याचा अधिकार आहे.)

ज्ञान प्रसार माध्यमाने भारत सरकारच्या शेती, सहकार, व शेतकरी कल्याण विभाग अंतर्गत कोल शृंखला विकासात राष्ट्रीय केंद्राने पुरविलेल्या सेवा (अधिसूचना क्रमांक ९/२०१६ सेवा कर दिनांक १ मार्च २०१६ अनुसार सेवा करामधून सवलत मिळवण्याचा अधिकार आहे.)

मादक पेय वगळून शेती उत्पादनाच्या वाहनांमधील वाहतुकीच्या मार्गाने पीठ , चहा, कॉफी , गूळ, साखर, दूध उत्पादने, मीठ आणि खाद्यतेल यासह खाद्य पदार्थांची माल वाहतूक शाखेकडून पुरविलेल्या सेवा (अधिसूचना क्रमांक ३/२०१३ सेवाकर पॅरा १ मार्च २०१३ अनुसार सेवा करामधून सवलत मिळवण्याचा अधिकार आहे.)

## १.१८ अनुकूल शुल्क

१. सरकारने खालील प्रकल्पांना प्रकल्पांसाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाच्या बाबतीत आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंचा विस्तार केला आहे.

२. अन्नधान्य हाताळणी यंत्रणेच्या स्थापनेची योजना आणि अन्न व धान्यांसाठी मंडळे आणि गोदामामध्ये गुतंवणूकीसाठी सवलत दिली आहे.

३. शेतीचा जोड व्यवसाय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मधमाशी प्रकल्प किंवा जेथे त्या पाळल्या जातात अशी जागा, बागायती, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, जलतरण व समुद्री उत्पादन आणि मांस याचे संरक्षण, साठवण किंवा प्रक्रिया यासाठी शीतीकरण साखळी (शेतांवर पूर्व थंड करण्यासाठी) किंवा औद्योगिक प्रकल्प यासाठी अनुकूल शूल्क योजना राबवली जाते.

४. मालमत्तेचा भाग म्हणून आयात केलेले अन्न प्रक्रिया संबंधित सर्व तांत्रिक वस्तू, त्यांचे भाडे यांचे वर्गीकरण यामध्ये कमी जास्तपणा असला तरीही, सवलतीची मूळ अबकारी कराचा परिणामी एकसमान मूल्यांकन मिळण्याचा अधिकार असेल. (अधिसूचना क्रमांक १२/२०१२ दिनांक १७ मार्च २०१२)

५. शीतीकरणासाठी किंवा वस्तूंसाठी सध्याच्या उपलब्ध असलेल्या मुळ सवलतीच्या अबकारी कराने ( शीत संग्रहालयाच्या पूर्वी आणि शीतकरणासह) थंड खोलीत १० वर्षापासून शीत शृखंला सहित पूर्व शीतीकरण युनिट, बंदिस्त गोदामे, चाळणी आणि हाताळणीसाठी ५ ते १० टक्के पर्यंत सवलत वाढविलेली आहे.

६. शीतीकरण वाहनावरीलअबकारी कर १० टक्क्यावरून ५ टक्क्याने कमी करण्यात आली आहे. (२०१६-१७ च्या अर्थसंकल्पात).

## १.१९ अबकारी शुल्क

अन्न उत्पादने

दूध, दुग्धजन्य पदार्थ, भाजीपाला, काजू आणि फळे यांच्यावर अबकारी शुल्क नाही तसेच १२ टक्के मानक अबकारी शुल्काविरूध्द प्रक्रिया केलेले फळे आणि भाजीपाला व्हॅटशिवाय २ टक्के दराने किंवा व्हॅटसह ६ टक्के दराने कर आकारले जाते. दूध पिणे, जनावरांचा सुगंधित दूध देखील २ टक्के ते ६ टक्के पर्यंत अबकारी शुल्क आहे.

अन्नप्रक्रिया यंत्रणा, मांस, कुकूटपालन, फळे, काजू किंवा भाज्या आणि दारू , सफरचंदाचा रस, फळाचा रस इ. वापरल्या जाणाऱ्या यंत्रावर वापरल्या जाणाऱ्या यंत्रसामग्रीवर अबकारी कर १० टक्के पासून कमी केला आहे. २०१४-१५ च्या बजेटमध्ये ६ टक्के शेती, मधमाशा जेथे पाळतात, अशी जागा, बागायती आणि समुद्री उत्पादन तसेच दुग्धशाळा व कुकूटपालनाचे संरक्षण, साठवण, वाहतूक किंवा प्रक्रिया यासाठी शीतगृहे, किंवा शीत वाहनांची निर्मिती करणारी सर्व शीतीकरण यंत्रे आणि त्यांचे भाग या गोष्टींना अबकारी शुल्क मधून मुक्त केले आहे. (अधिसूचना क्रमांक १२ /२०१४ केंद्रीय उत्पादक शुल्क, ११ जुलै २०१४)

दुग्ध क्षेत्रात वापरले किंवा तयार केले जाणारे पदार्थ कोरडे बाष्पीभवन इत्यादी यंत्रास अवकारी करावरून सूट आहे. (संदर्भ अधिसूचना क्रमांक १२/२०१२, केंद्रीय उत्पाद शुल्क दिनांक १७ मार्च २०१२)

शीतीकरण वाहनासह मशीनवरील अबकारी कर १२.५ टक्केवरून ६ टक्केवर आणला आहे. (२०१६-१७ च्या अर्थसंकल्पात)

भांडवली वस्तूंवर अबकारी कराचे शुल्क आणि मांस, फळ किंवा यासारख्या वाहतूकीसाठी रेफ्रिजरेटर वाहनांसह विविध प्रकारचे मालवाहू नौकांसाठी आवश्यक कच्चा माल, भाग आणि सामग्री हाताळणी विविध प्रकारचे मालवाहू नौकांसाठी आवश्यक कच्चा माल, भाग आणि सामग्री हाताळणी उपकरणे, त्यातील अबकारी शुल्कात फरक आहे. (अधिसूचना क्रमांक १२२०१६, केंद्रीय अबकारी शुल्क, १ मार्च २०१६)

सर्व प्रकारच्या कारखान्यांवर (प्रक्रिया करण्यात आलेले व्हेल मासे जास्त दिवस ठेवण्यासाठी किंवा यासारखी), अबकारी शुल्क नाही (अधिसूचना क्रमांक १२/२०१६, केंद्रीय अबकारी शुल्क, १ मार्च २०१६) इतर मासेमारीच्या नौकायानांवर शून्य उत्पादन शुल्क आहे. (अधिसूचना क्रमांक १२/२०१६ केंद्रीय अबकारी कर शुल्क १ मार्च २०१६).

## १.२० गुंतवणूक संधी

- फळे, भाज्या:  संरक्षित, शर्करावगुंठित, चमकदार आणि स्फटीकयुक्त फळे आणि भाज्या, जवस, जाम, जेली, सूप पावडर, निर्जलीकृत भाज्या, इ. तयार खाद्यपदार्थ इ.
- आंबवायला ठेवाण्याव्दारे अन्न संरक्षण:  वाईन, बिअर, व्हिनेगर, यीस्ट, मदयार्क पेय इ.
- पेय: फळ आधारित, अन्नधान्य आधारित इ.
- दुग्धशाळा: द्रव, दही, सुवासिक दुध, प्रक्रिया केलेले चीज, कॉटेज चीज, स्विस चीन, आईस्क्रीम, दुधावर आधारित मिठाई इ.

## १.२१ खाद्यपदार्थ आणि पौष्टीकता [६]

- मिठाई आणि बेकरी: कुकीज आणि बिस्किटे, ब्रेड, केक्स आणि गोठवलेल्या कणके इ.
- मांस आणि कुकूटपालन: अंडी, अंडयांचे पदार्थ, कट मीट, सॉसेज, अन्य मूल्यवर्धित उत्पादन इ.
- धान्यप्रक्रिया: तेल मिलिंग क्षेत्र, तांदूळ मिलिंग आणि मैदा मिलिंग इ.
- मासे समुद्री खाद्य आणि मासे प्रक्रिया: प्रक्रिया आणि अतिशीत युनिट इ.
- खाद्य प्रक्रिया उपकरणे:  डबाबंद पादार्थ, दुग्धालय, अन्न प्रक्रिया, विशेष प्रसंस्करण, गोठविलेल्या अन्न / शीतीकरण इ.
- ग्राहक खाद्य: पॅकेज केलेले खाद्य, मद्यपान आणि शुध्द पिण्याचे पाणी इ.

## १.२२ पुरवठा श्रृंखलेच्या पायाभूत सुविधा [७]

या प्रकल्पाला अन्न प्रक्रिया पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करण्याची क्षमता आहे.  सरकारचे मुख्य केंद्र पुरवठा श्रृंखला संबंधित पायाभूत सुविधा जसे की शीतगृहे, व अन्न प्रक्रिया उदयाने यावर आहे. उद्योजकांसाठी एक अनोखी संधी आणि परदेशी गुंतवणूकदारांचा समावेश भारतीय अन्न प्रक्रिया क्षेत्रामध्ये करणे आवश्यक आहे.

## १.२३ संस्था

- अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालय
- भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकारण
- कृषी आणि प्रक्रिया अन्न निर्यात विकास प्राधिकरण
- राष्ट्रीय अन्न प्रक्रिया संस्था आणि उदयोजक व्यवस्थापन
- भारतीय अन्न प्रक्रिया संघटना
- वाणिज्य आणि मंत्रालय, अन्नप्रक्रिया मंत्रालय : कॉफी, चहा , मसाला, मांस आणि द्राक्षे यांच्या अंतर्गत भारतीय द्राक्ष प्रक्रिया महामंडळ इ.

**कोष्टक क्रमांक १.२ अन्नप्रक्रिया उद्योगात रोजगाराच्या वेगवेगळया राज्यांमधील हिस्सा २०१०**

| अनु. क्र | राज्यांची नावे | रोजगार (टक्केवारीमध्ये) |
|---|---|---|
| १ | आंध्रप्रदेश | १४.१ |
| २ | आसाम | ४.७ |
| ३ | गुजरात | ५.९ |
| ४ | हरियाणा | ३.३ |
| ५ | कर्नाटक | ६.० |
| ६ | केरळ | ११.९ |
| ७ | मध्यप्रदेश | २.३ |
| ८ | महाराष्ट्र | ७.८ |

| | | |
|---|---|---|
| ९ | पंजाब | ७.७ |
| १० | तामिळनाडू | ११.२ |
| ११ | उत्तरप्रदेश | १२.० |
| १२ | पश्चिम बंगाल | ४.८ |
| १३ | इतर | ८.३ |

स्त्रोत - राष्ट्रीय औदयोगिक सर्वेक्षण - २०११-१२

## १.२४ अन्नप्रक्रिया उद्योगात कौशल्याचा अभाव ८

अन्नप्रक्रिया उद्योगातील विविध विभागामध्ये आढळणारे कैशल्य पुढील विभागात विश्लेषण केले आहे. जर भारताने जागतिक बाजारपेठेत आपले अस्तित्व निर्माण केले असेल, तर या अंतराने शक्य तितक्या लवकर पुर्ण करण्याची आवश्यकता आहे. मागणी आणि पुरवठा बाजारमध्ये एक प्रचंड अंतर आहे.

एनएसडीसने केलेल्या सर्वेक्षणानुसार, अन्नप्रक्रिया उद्योगात सर्व स्तरावर कुशल कामगारांची प्रचंड मागणी आहे, विशेषत: अल्पकालीन अभ्यासक्रम प्रशिक्षण घेत असलेल्या व्यक्तीसाठी दहावी - बारावीपर्यंत शैक्षणिक स्तर खालील कुशल मानवी संसाधनाची मागणी सातत्याने वाढत आहे, परंतु संघटीत क्षेत्रापेक्षा असंघटीत क्षेत्रात जास्त मागणी आहे, असंघटीत क्षेत्रासाठी संघटीत क्षेत्र फारच लहान आहे, ते खालील तक्त्याव्दारे मांडले आहे.

**कोष्टक्र क्रमांक १.३ असंघटीत क्षेत्रातील आणि संघटीत क्षेत्रातील मागणी (टक्केवारी)**

| अनु .क्र | क्षेत्र | प्रशिक्षित मानवी संसाधनाची एकूण मागणी | प्रशिक्षित मनुष्यबळाची मागणी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | फळे आणि भाज्या प्रक्रिया | १२ | २ |
| २ | अन्नधान्य | ४२ | ८ |
| ३ | दुग्ध उत्पादने | ६८ | १२ |
| ४ | मांस आणि कुकूटपालन प्रक्रिया | १०४ | १९ |
| ५ | मासे प्रक्रिया | ०१ | ०० |
| ६ | पाव आणि बेकरी | २५८ | ४६ |
| ७ | मदयार्क | ४२ | ०८ |
| ८ | शीत पेये (एरेटेड वॉटर /सॉफट ड्रींक्स) | ०२ | ०० |
| | एकूण | ५३० | ९५ |

स्त्रोत - राष्ट्रीय औदयोगिक सर्वेक्षण - २०११-१२

अन्न प्रक्रिया उद्योगात अल्पकालीन /मॉडयूलर प्रशिक्षण उपक्रमादवारे प्रशिक्षित व्यक्तीसाठी वाढीव मानवी संसाधन आवश्यकता - वार्षिक आवश्यकता अन्नप्रक्रिया उद्योगात उपस्थित असलेल्या विविध कौशल्य कार्यक्रमांचा अभ्यास केला आहे, अन्न प्रक्रिया उद्योगाच्या विकासासाठी भारत सरकारच्या विविध विज्ञान आणि तंत्रज्ञान धोरणांच्या पुढाकारांवर विचार केला आहे.

**कोष्टक्र क्रमांक: १.४ अन्नप्रक्रिया क्षेत्रामध्ये व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम प्रदान करणाऱ्या विविध संस्था**

| अनु.क्र | मंत्रालय /विभाग | तरतूद असलेल्या योजना /कार्यक्रम /संस्था व्यावसायिक प्रशिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम | लक्ष्य गट | प्रशिक्षण कालावधी (अल्प मुदती/ दीर्घकालीन ) |
|---|---|---|---|---|
| १ | अन्नप्रक्रिया उद्योगमंत्रालय | १.१९९२ - ९३ पासून २०००-०१ दरम्यान ३६ खाद्य प्रक्रिया व प्रशिक्षण केंद्र (एफपीटीसी) स्थापन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना | प्राधान्य असलेल्या ग्रामीण भागात राहणारे लोक महिला, अनुसूचित | अल्पकालीन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अनुदान दिले गेले. सेंट्रल फूड टेक्नॉलॉजी रिसर्च इन्स्टिटयूट , पडी प्रोसेसिंग रिसर्च सेंटर ,पीएचटीसी, कौन्सिल ऑफ एंअरप्रेन्यूरियल डेव्हलमेंट प्रोग्राम (ईडीपी) यासारख्या संस्थादेखील प्रशिक्षण अभ्यासक्रम आहेत. ग्रामीण भागातील व्यक्ती शक्ती विकास (एफपीटीसी योजना ), अन्न प्रक्रिया , चाचणी प्रशिक्षण, गुणवत्ता व्यवस्थापन ई.मध्ये मानवी संसाधनांच्या विकासासाठी उद्योजकता विकास कार्यक्रम. | जाती, अनुसूचित जमाती आणि इतरांना दिले जात आहे. समाजातील दुर्बल घटक मुख्यत: अन्न प्रक्रिया उद्योगातील व्यक्ती. व्यवस्थापक तंत्रज्ञ आणि उद्योजकांकडून इच्छुक उमेदवार. | नेहमीप्रमाणे एआयसीटीई मान्यताप्राप्त डिप्लोमा/पदीव अभ्यासक्रम अवधी (दीर्घकालीन ) |
| २ | सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय (लघु उद्योग विकास संस्था - एसआयडीओ ) | उद्योजकता विकास कार्यक्रम, कौशल्य विकास कार्यक्रम (एसडीपी) व्यवस्थापन विकास कार्यक्रम | कामगार सुशिक्षित बेरोजगार युवक उद्योंजक | अल्पकालीन आणि दीर्घकालीन दोन्ही |

**कोष्टक क्रमांक: १.५ अन्नप्रक्रिया कार्यक्रम आणि धोरण (टक्केवारी)**

| अ.क्र | धोरण /कार्यक्रम | वर्ष | गुणविशेष | गॅप/प्रतिबंध |
|---|---|---|---|---|
| १ | एचएसीपीच्या अंमजबजावणीची योजना आयएसओ २२०००, आयएसओ १४०००/जीएचपी/जीएमपी गुणवत्ता / | २००५ | जगाच्या गुणवत्ता मानकांशी जुळवा | उद्योगाच्या संख्येबाबत अन्न प्रक्रिया केंद्राची संख्या अत्यंत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सुरक्षित व्यवस्थापन | | | असमान आहे. |
| २ | तंत्रज्ञानाची प्रगती योजना, स्थापना आणि आधुनिकीकरण अन्न प्रक्रिया उद्योग (स्त्रोत : एमओएफपीआय २००६-२००७) | २००७ | उद्योजगांच्या प्रक्रियेच्या पातळीत वाढ करण्यासाठी आणि नवीन उद्योग उभारणीसाठी आर्थिक हस्तक्षेप | असंघटीत क्षेत्राचे कार्यक्षेत्र कशा प्रकारे येईल याबददल कोणतीही माहिती नाही. भांडवली अनुदानाची मर्यादा वाढविण्याची सतत मागणी आहे. परंतु हया योजनेवर मर्यादित संसाधनांच्या दृष्टीकोनाने व वेगाने मागणी लक्षात घेवून हे शक्य नाही असे दिसते |
| ३ | उद्योजकत विकास कार्यक्रम (स्त्रोत : अकराव्या योजना आयोग अहवाल २००७ ) | २००७ | अन्न प्रक्रिया उद्योगाची स्थापना करण्यासाठी विविध संस्थांना आर्थिक मदत | व्यवसाय अयशस्वी झाल्यास उष्मायन धोरण नाही |
| ४ | प्राथमिक प्रक्रिया तयार करण्याची योजना ग्रमीण भागातील केंद्र / संकलन केंद्र (स्त्रोत : | २०११ | स्थानिक उद्योजक आणि स्थानिक पातळीवर उत्पादित | उद्योजक या सर्व सुविधांवर पुरेसे लक्ष देत नाहीत, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | डब्ल्यू.जी.एफवायपी २०११) | | कच्च्या मालाचा वापर करून अन्न प्रक्रिया करिता तंत्रज्ञान हस्तांतरण | त्यामुळे सर्व जबाबदारी शेतकरी गटांवर येते. |
| ५ | मान्यताप्राप्त राष्ट्रीय / राज्यातील प्रशिक्षण एमओएफपीआय/इतर प्रशिक्षण कार्यक्रम (स्त्रोत : मानव संसाधन विकास मंत्रालय , वार्षिक अहवाल २०११-१२) | २०११ | प्रशिक्षण देण्यासाठी शेतकरी किंवा आगामी उद्योजकांना आर्थिक मदत | प्रशिक्षण कंद्राचे स्थान आणि आत्तापर्यंत अर्थसंकल्पीय तरतूदीची कोणतीही प्रशिक्षण संस्था अस्तित्वात नाही. |
| ६ | अन्न प्रक्रिया उद्योग तंत्रज्ञानातील पदवी / पदविका अभ्यासक्रमांसाठी मूलभूत सुविधा निर्माण करणे (स्त्रोत : मानव संसाधन विकास मंत्रालय वार्षिक अहवाल २०११-१२) | २०११ | अन्न तंत्रज्ञानमध्ये अभ्यास सुरू करण्यासाठी शैक्षणिक संस्था आर्थिक मदत | बाजारपेठेच्या मागणीनुसार अभ्यासक्रम परिचय करून देणारी समस्या आहे. विविध अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केले गेले आहेत. परंतु त्यांच्याकडे बाजारपेठ मागणी पुरेसे आहे की नाही याबाबत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आकडेवारी नाही . |

स्त्रोत - राष्ट्रीय औदयोगिक सर्वेक्षण - २०११-१२

केंद्र सरकारतर्फे विकसित केलेल्या बहुतेक योजना या सर्वसामान्य असतात. या योजनांचा लाभ घेण्यासाठी, संबंधित राज्यांना त्यांच्या स्वत:ची धोरणे विकसित करणे आवश्यक आहे. जे त्यांच्या सामाजिक आर्थिक आदेश कृषी पशुधन संसाधन आधारानुसार आहेत. केंद्र आणि राज्यातील धोरणांना विविध अडचणीवर मात करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे.

पुरेशा पायाभूत सुविधांची उपलब्धता, कोल्ड चेन, पॅकेजिंग आणि ग्रेडींग केंद्राची उपलब्धता नसणे, पुरेसे गुणवत्ता नियंत्रण नसणे आणि चाचणी पायाभूत सुविधा, अकार्यक्षम पुरवठा साखळी, शेती उत्पादनांच्या प्रक्रियात्मक वाणांची कमतरता, कच्चा मालाची क्षमता, उच्च यादी खर्च, उच्च कर, उच्च पॅकेजिंग खर्च, न परवडणारे तांत्रिक सामर्थ्य या गोष्टींना प्राधान्य नाही.

अन्नप्रक्रिया क्षेत्रांमध्ये एकाच व्यापक धोरणाऐवजी बहुविध कायद्यादवारे संचलित केले जाते. अन्नप्रक्रिया उद्योगाच्या अंमलबजावणीत अन्न कायद्यानुसार केवळ १३ केंद्रीय आदेशांचा समावेश असलेल्या ९ मंत्रालयांचा समावेश आहे. तसेच राज्याचे स्वत:चे नियंत्रण कक्ष आहेत. अन्न प्रक्रिया उद्योग अधिक प्रभावी होण्यासाठी औदयोगिक धोरणे सर्वसमावेशक असले पाहिजे आणि अनेक कायदेविषयक, प्रशासकीय आणि प्रोत्साहनपर उपाय योजणे आवश्यक आहे.

नोंदणीकृत उद्योग ंचे किंवा उपक्रमांचे प्रमाण ग्रमापंचायतकडे मोठया प्रमाणात नोंदले जाते. कृषी उद्योगात तंत्रज्ञान आणि पत पुरवठा वाढविण्यासाठी, त्यांना एकल नोंदणी प्राधिकरण अंतर्गत आणणे आणि गावपातळीवरील कृषी उद्योग नोंदणी करण्यासाठी एक प्रचंड मोहिम सुरू करणे आवश्यक आहे. सरकारी कार्यक्रमाव्यतिरिक्त, पायाभूत सुविधांच्या अभावामुळे कृषी उद्योगाची वाढ खुंटली जाते. यात वीज जोडणी, वीजेची उपलब्धता, वाहतूक सुविधा इत्यादींचा समावेश आहे. ग्रामीण पायाभूत सुविधांच्या व्यापक विकासादवारे या उपक्रमांच्या आर्थिक व्यवहार्यतेसाठी पायाभूत सुविधांची गरज आहे.

## १.२५ संधी

भारतीय खाद्यप्रक्रिया उद्योगात गेल्या काही वर्षात लक्षणीय वाढ  झाली आहेत.  बाजार, ग्राहक विभाग आणि धोरणांच्या नियमात बदल होत आहे. लोकसंख्याशास्त्र बदलणे, वाढती लोकसंख्या आणि भविष्यात जलद शहरीकरणाचा विकास सुरू राहण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे मुल्यवर्धित उत्पादनांचे मागणी आणि त्यामुळे अन्न प्रसंस्करण उद्योग भारतामध्ये आकाराला  येणार आहे.

प्राधान्य क्षेत्र म्हणून भारत सरकार प्रथम प्रथिने उद्योगावर लक्ष केंद्रीत केल्याने या क्षेत्रातील गुंतवणूकीला पाठींबा देणाऱ्या धोरणाची खात्री करणे अपेक्षित आहे. थेट परकीय गुतंवणूक आकर्षित करणे अपेक्षित आहे. भारताला नैसर्गिक संसाधनांचा आणि तांत्रिक ज्ञानाच्या पायाभूत सुविधांची जास्तीत जास्त उपलब्धता असणे या उद्योगात इतर देशांपेक्षा मजबूत तुलनात्मक फायदे आहेत.

भारतातील अन्नप्रक्रिया क्षेत्र हे गुंतवणूकीसाठी एक आकर्षक क्षेत्र आहे. गुंतवणुकदारांना महत्वपूर्ण वाढीची क्षमता देते. या क्षेत्रात संशोधन व विकास करण्यासाठी एक मोठी संधी आणि क्षमता आहे. अकुशल श्रमिकांना प्रशिक्षित करण्याची गरज आहे. विविध योजना मानव संसाधन विकासासाठी आवश्यक आहे. भारत अन्नप्रक्रिया क्षेत्रातील सर्व संधीचा वापर करू शकतो जेंव्हा त्यांची कामगार शक्ती शिक्षित आणि कुशल असते.

सरकारला त्याच्या कौशल्य विकास कार्यक्रमाला बळकटी देण्याची गरज आहे. नवीन प्रशिक्षण संस्था खुल्या कराव्यात, जी बाजाराच्या मागणीशी सुसंगत आहे. शीतीकरण साखळी, रस्ते, सुविधा आणि वीज यासारख्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे अन्नप्रक्रिया उद्योगाला बळकटी मिळेल.

नाशवंत अन्नपदार्थ उत्पादनावर फळ, भाजीपाला, दुग्धव्यवसाय, उद्योग, मांस आणि कुक्कुट विभाग यासारख्या उत्पादकांना सकारात्मक प्रतिसाद मिळेल. अन्न प्रक्रिया उद्योग भारतीय अर्थव्यवस्थेला उच्च विकासासाठी चालविण्यास तयार आहे. केवळ क्षेत्रीय तंत्रज्ञानाच्या विकासावर आणि कुशल मनुष्यबळ तयार करण्यावर लक्ष देणे गरजेचे आहे.

२००५ मध्ये मुल्यवर्धित कर वाढवून २०२० पर्यंत ३५ टक्क्यांवरून २० टक्केवर आणण्याची सरकारची योजना होती.  पीपीपी मॉडयूल खासगी क्षेत्रासाठी आदर्श आहेत, २०२५ पर्यंत घरगुती वापराची दुप्पट मजबूत मागणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

संभाव्य जागतिक पातळीवर भारताकडे पाहताना जगातील प्रमुख बाजारपेठ म्हणून पाहिले जावे या उददेशाने भारत सरकारने एसईझेड, मेगा फूड पार्क, सोपे पतधोरण मध्ये गुंतवणूक करून मदत केली आहे.

## १.२६ अन्न प्रक्रिया उदयानांची स्थापना ९

उद्योजकांसाठी एक नवीन संधी, परदेशी गुंतवणूकदारांना भारतीय खाद्य प्रक्रिया क्षेत्रामध्ये प्रवेश करणे, चालू आर्थिक वर्षात १६ व्या वर्षी अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालयाने मेगा फूड पार्क प्रकल्पांसाठी १८.१ दशलक्ष डॉलर्सचा निधी मंजूर केला आहे. ऑक्टोबर २०१८ मध्ये केंद्र सरकारने घोषित केले की पुढील वर्षात सर्व ४२ मोठे अन्न प्रक्रिया उदयानांची कार्यरत होतील.

पुरवठा श्रृंखलेच्या मूलभूत संरचना आणि करार शेती कार्यक्षमता व बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यासाठी दोन्ही कंपन्या आणि सरकार उत्सुक आहेत. अन्नप्रक्रिया पायाभूत सुविधामध्ये २२ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक क्षमता आहे तर, या क्षेत्रातील १०० टक्के थेट परकीय गुतंवणूक करणाऱ्या कंपन्या सुरक्षितपणे पुरवठयासाठी कंत्राटी शेतीच्या वापरास आधिक प्रमाणात प्राधान्य करतात.

## १.२७ पुरवठा श्रृंखलेच्या पायाभूत सुविधा

अन्न प्रक्रिया उद्योग ात पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करण्याची क्षमता आहे, सरकारचे मुख्य केंद्र श्रृंखला संबंधित पायाभूत सुविधा , शीतगृहे व फूड पार्क यावर आहे. अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रलयाने (एमएफपीआय) एक नवीन केंद्र प्रायोजित योजना (सीएसएस) सुरू केली आहे.

## १.२८ राष्ट्रीय अन्न प्रक्रिया प्रकल्प (एनएमएफपी)

१२ व्या योजनेत (२०१२-२०१३) राज्यामार्फत कार्यान्वित करण्यासाठी एनएमएफपीमध्ये राज्य आणि जिल्हा स्तरावर राष्ट्रीय मोहीम तसेच संबंधित मोहिमांची स्थापना करण्यात आलेली आहे. एनएमएफपी विविध योजनांच्या नियोजन, पर्यवेक्षण आणि देखरेखीच्या दृष्टीने लक्षणीय सुधारणा करू शकते.

## १.२९ जाहिरात उपक्रमांसाठी योजना

अ. सेमिनार/कार्यशाळा आयोजित करणे

ब. अभ्यास/सर्वेक्षण आयोजित करणे

क. प्रदर्शन / मंडळे

ड . जाहिरात आणि प्रसिध्दी

अन्नप्रक्रिया उद्योगाचे आधुनिकीकरण तंत्रशास्त्र उन्नतीसाठी /आस्थापनासाठी योजना देशातील प्रचलित युनिटची पदवी आणि विस्तार युनिटसची स्थापना करण्यासाठी आर्थिक सहाय्य विस्तारास प्रोत्साहन देते ज्यात तंत्रज्ञ ाानाचा समावेश आहे.

## १.३० खाद्यप्रक्रिया उद्योगात लागू असलेल्या कायद्याची सूची [१०]

अन्नप्रक्रिया उद्योगात लागू असलेल्या कायद्याची यादी खालीलप्रमाणे आहे.

**अ. खाद्यान्न कायदे**

१. खाद्य सुरक्षा आणि मानक कायदा , २००६
२. अन्न सुरक्षा आणि मानके ( परवाना व अन्न व्यवसाय नोंदणी ) नियम २०११
३. खाद्य सुरक्षा आणि मानके (पॅकेजिंग आणि लेबलिंग) नियम २०११
४. अन्न सुरक्षितता आणि मानदंड (खाद्य उत्पादनाचे मानक आणि खाद्यसंवर्धन ) नियम २०११
५. अन्न सुरक्षितत आणि मानदंड (प्रतिबंध आणि विक्रीवरील प्रतिबंध) नियमन २०११
६. अन्न सुरक्षितता आणि मानके (दूषित पदार्थ , टॉक्सीन आणि अवशेष ) नियमन २०११
७. खाद्य सुरक्षा आणि मानक (प्रयोगशाळा आणि नमूना विश्लेषण) नियम २०११

**ब. कायदेशीर बेपर्वा कायदा**

१. लीगल मेट्रोलॉजी ॲक्ट २००९

  १.१ कायदेशीर मेट्रोलॉजी (सामान्य ) नियम २०११

  १.२ लीगल मेट्रोलॉजी (पॅकेज केलेली कमोडिटीज) नियम २०११

**क. आर्थिक कायदे**

१. आयकर कायदा , १९६१
२. सानुकूल कर कायदा १९६२
३. सानुकूल कर कायदा , १९७५
४. केंद्रीय उत्पादन अधिनियम, १९४४
५. केंद्रीय अबकारी कर कायदा, १९८५
६. वित्त कायदा, १९९४ - सेवा कर
७. मुल्यवर्धीत कर (व्हॅट)

**ड. मजुरीचे कायदे**

१. कारखाने कायदा १९४८
२. कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी आणि संकीर्ण तरतुदी कायदा १९५२
३. कर्मचारी राज्य विमा कायदा १९४८
४. करार मजूर (नियमन व उन्मुलन ) कायदा , १९७०
५. बालमजुरी (निषिध्द व नियमन ) अधिनियम १९८६
६. वेतन अधिनियम, १९३६
७. किमान वेतन अधिनियम, १९४८
८. दुकाने व अस्थापना संबंधित राज्यांचे कायदा
९. विक्री संघटना कायदा, १९२६
१०. औद्योगिक विवाद कायदा १९४७
११. औदयोगिक रोजगार कायदा, १९४६
१२. कर्मचारी भरपाई कायदा १९२३

१३. प्रशिक्षणार्थी कायदा १९६१

१४. रोजगार विनीमय (रिक्त जांगाची अनिवार्य सूचना ) कायदा, १९५९

१५. समान  वेतनवाढ कायदा, १९७६

१६. लाभांश कायदा १९६५ चे पैसे

१७. ग्रॅच्युटी कायदा, १९७२, पेमेंट

१८. अंतर राज्य प्रवासी कामगार (रोजगार नियमन आणि सेवा अटी ) १९७९

१९. श्रमविषयक कायदे (फर्निचर रिटर्न्स आणि मेन्टेनिंग रजिस्टर्सकडून  सूट, काही अस्थापनानुसार ) अधिनियम, १९८८

२०. संबंधित राज्याचे कामगार कल्याण निधी अधिनियम

२१. मातृत्व लाभ अधिनियम १९६१

२२. असंघटीत  कामगार समाजिक  सुरक्षा कायदा २००८

**इ .  विदेशी विनिमय कायदे**

१.  परकीय चलन व्यवस्थान कायदा , १९९९ (फेमा) आणि नियम त्याअंतर्गत जारी केले.

**ई. पर्यावरणी कायदे**

१.  पर्यावरण (संरक्षण ) अधिनियम, १९८६ आणि या अतंर्गत  जारी केलेल्या अधिसूचना  कायदा

**उ. स्थानिक कायदे**

१.  संबंधित  राज्यांचे  नगरपालिका अधिनियम

२.  संबंधित  राज्यांचे  पंचायत कायदे

**ऊ. खाद्याचे मानक**

१.  एगमार्क

२.  भारतीय मानक ब्युरो (बीआयएस)

३. कोडेक्स

४. एचएसीसीपी

५. आयएसओ ९०००

## १.३१ खाद्यान्न सुरक्षा आणि मानक अधिनियम, २००६ नियम व विनियम [११]

अन्न सुरक्षा आणि मानक कायदा हा राष्ट्रपतीची मान्यता प्राप्त ऑगस्ट २००६ आणि ५ ऑगस्ट २०११ रोजी अंमलात आले. अधिनियमातील सर्व तरतुदी अंमलात आलेल्या आहेत. परंतु आनुवंशिकरित्या सुधारित अन्न, सेंद्रीय अन्न, कार्यशील खाद्य पदार्थ, स्वामित्वयुक्त पदार्थ ई. खाद्य सुरक्षा आणि मानक नियम आणि विनिमय २०११ एकाच नियामकांखाली अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण ४ ऑगस्ट २०११ रोजी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेव्दारे पुर्वीच्या विद्यमान आठ अन्न कायद्याव्दारे स्थापित नियामक आराखडा रदद केला: ५ मे २०११ रोजी भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने भारतीय अन्नधान्य आणि मानक नियम २०११ प्रकाशित केले.

अधिसूचना क्रमांक जीएसआर ३६२ ई भारतीय सरकारी गॅजेटमध्ये अधिसूचनेमध्ये सांगितल्याप्रमाणे, हे नियम ५ ऑगस्ट २०११ पासून लागू झाले. खाद्य सुरक्षा आणि मानक कायदा २००६ च्या कलम ९८ च्या अंमलबजावणीसाठी हे नियम आणि अंमलबजावणीची यंत्रणा, नमूना तंत्र आणि इतर कायदेशीर बाबी निर्दिष्ट करतात. १ ऑगस्ट २०११ रोजी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने खाद्य सुरक्षा आणि मानक विनियम २०११ मध्ये अधिसूचना भारतीय अधिकृत राजपत्रात २-१५०१५/३०/२०१० अन्न सुरक्षा आणि मानक विनियम, २०११, ५ ऑगस्ट २०११ पासून ३८ कायदे अंमलात आले. या नियमांमध्ये पॅकेज केलेले अन्न पदार्थ, परवानगी असलेल्या खाद्य, सुक्ष्मजीवशास्त्रीयदृष्टया आवश्यकता मानके समाविष्ठ आहेत.

अन्न सुरक्षा आणि मानक कायदा २००६ अंमलबजावणी खालील कायदे औपचारिकरित्या रदद करते.

- अन्न अडथळा निवारण कायदा (पीएफए) १९५४
- फळे उत्पादन आदेश, १९५५
- द मेट फूड प्रॉडक्ट आदेश, १९७३
- भाजीपाला उत्पादन आदेश, १९९८

- तेलबीया उत्पादन आदेश, १८८८
- दुग्ध व दुग्धजन्य पदार्थ आदेश, १९९२
- अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ खाली अन्नपदार्थासंबंधीचे इतर आदेश

**कोष्टक्र क्रमांक: १.६ गुन्हयाचे स्वरूप आणि दंड**

| अ.क्र | गुन्हयाचे स्वरूप | दंड |
|---|---|---|
| १ | मागणी न केलेल्या मांसाहार पदार्थांचा पूरवठा आणि नैसर्गिक वस्तू किंवा पदार्थांची विक्री करणे | पाच लाख रूपयापेक्षा अधिक दंड |
| २ | नमुन्यापेक्षा कमी असलेल्या पदार्थांची विक्री किंवा विक्रेत्यांना वितरण किंवा अन्न आयात करणे | पाच लाख रूपयापर्यंत दंड |
| ३ | मिसब्रॅन्डेड अन्न | तीन लाख रूपयांचा दंड |
| ४ | दिशाभूल करणारी जाहिरात | दहा लाख रूपयांचा दंड |
| ५ | असंतुलित पदार्थ असलेले अन्न | एक लाख रूपयापर्यंत दंड होवू शकतो |
| ६ | अन्न सुरक्षा अधिकारीच्या निर्देशांचे पालन करण्यात अयशस्वी | दोनलाखापर्यंत वाढू शकतो दंड |
| ७ | अस्वच्छ किंवा अनियंत्रित प्रक्रिया किंवा अन्नाचे उत्पादन | एक लाख पर्यंत दंड रूपये |
| ८ | कोणत्याही भेसळयुक्त वस्तू विक्रीसाठी बनवितो , विकतो किंवा वितरित करतो | जेथे अशा भेसळ आरोग्यासाठी हानीकारक नाही, दंड दोन लाख रूपयापेखा जास्त नसेल<br>-जेथ्ये अशा भेसळ आरोग्यासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | हानिकारक आहे दहा लाख रूपयापेक्षा आधिक दंड नाही. |
| ९ | असुरक्षित अन्न | जेथे अशा अपयश किंवा उल्लघंनाचा परिणाम दुखापत होणार नाही, सह महिने मुदतीसाठी करावास आणि एक लाख रूपयापर्यंत दंड होवू शकतो.<br>जेथे अशा अपयश किंवा उल्लंघनामुळे नैसर्गिक दुखापत झाली, एक वर्षापर्यत कारावास आणि तीन लाख रूपयापर्यंत दंड होऊ शकतो.<br>ज्येथे अशा अपयश किंवा उल्लंघटनाचा परिणाम गंभीर जखमांवर पडतो. ज्यास सहा वर्षाचा कारावास आणि पाच लाख रूपयापर्यंत दंड होऊ शकतो.<br>जेथेअशा अपयश किंवा उल्लंघनामुळे मृत्यूस कारणीभूत ठरतो , ज्यास कारावासाची सात वर्षापेक्षा कमी नअसेल पण ज्यात आयुष्याची कारावासात वाढ होईल आणि दंडासह दहा लाख रूपयापेक्षा कमी नसेल. |

| | | |
|---|---|---|
| १० | जप्त वस्तूसह हस्तक्षेप | सहा महिने मुदतीसाठी आणि दोन लाख रूपयापर्यंत दंडाची कारावासाची शिक्षा. |
| ११. | असत्य माहिती | तीन महिने मुदतीसाठी आणि दोन लाख रूपयापर्यंत दंडाची रक्कम अशी कारावासाची शिक्षा. |
| १२ | खाद्यन्न सुरक्षा अधिकारीऱ्या अडथळा आणणे किंवा त्याची तोतयागिरी करणे | तीन महिन्यापर्यंत आणि दंड म्हणून तुरंगवासाची शिक्षा एक लाख रूपयापर्यंत वाढू शकते. |
| १३ | ग्राहक किंवा त्याच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या कोणत्याही वस्तूचे उत्पादन किंवा वितरण किंवा विक्री करते किंवा आयात करते. | मृत्यू झाल्यास ५ लाख रूपयांपेक्षा कमी रक्कम, गंभीर दुखापत झाल्यास तीन लाख रूपयापेंक्षा अधिक नसेल, दुखापतीच्या इतर सर्व बाबतीत एक लाख रूपयापेक्षा जास्त नाही. |

स्त्रोत - राष्ट्रीय औदयोगिक सर्वेक्षण - २०११-१२

## १.३२ औदयोगिक क्षेत्राशी संबंधित संस्था १२

### १.३२.१ राष्ट्रीय अन्न तंत्रज्ञान संस्था आणि उदयमिता व व्यवसथापन

खाद्यन्य विज्ञान आणि अन्न तंत्रज्ञान क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ठतेचे केंद्र बनविण्यासाठी एमएफपीआयने तयार केलेल्या अन्न, तंत्रज्ञान, उदयमिता व व्यवस्थापन (एनआयएफटीईएम) राष्ट्रीय संस्थेची स्थापना झाली. हे कुंडली, सोनापित, हरियाणाजवळ आहे. देश आणि आंतरराष्ट्रीय संस्था यांच्यातील संस्थांमध्ये सहकार्य आणि नेटवर्कींगला चालना देण्यासाठी ही एक उच्चतम जागतिक दर्जाची संस्था आहे. संस्थेने खाद्य उद्योगासाठी

विशिष्ट उच्च दर्जाचे शैक्षणिक, संशोधन आणि व्यवस्थापन कार्यक्रम सादर केला पाहिजे. अन्न मानकांविषयी संदर्भित सल्ला, अन्नक्षेत्रातील ज्ञानाचा प्रसार करणे आणि व्यवसाय उष्मायन सुविधा प्रदान करणे. निफटॅम हे अन्न प्रक्रिया क्षेत्राच्या क्षेत्राच्या जाहिरात रूपात काम करेल.

## **१.३२.२ निफटेम (NIFTEM) चे प्रमुख उदिदष्टये पुढीलप्रमाणे आहेत.**

१. या क्षेत्रातील सर्व समस्यांना आळा घालून त्यावर उपाय सुचविणे.
२. या क्षेत्रासाठी कौशल्य विकास आणि उद्योजगकता विकास कार्यक्रमात कार्यरत राहणे.
३. फळे आणि भाजीपाला, दुग्धव्यवसाय, मांस आणि धान्य प्रक्रिया करणाऱ्या प्रक्रियेसाठी त्याच्या अल्ट्रा आधुनिक पायलट प्लॉटसह व्यवसाय उष्मायन सेवा सुलभ करणे.
४. सेक्टरच्या विकासाकरिता दर्शनीय संशोधनाचे आयोजन करणे
५. अन्न विज्ञान आणि टेक्नॉलॉजीमध्ये प्रगत माहिती असलेल्या जागतिक दर्जाचे व्यवस्थान प्रतिभा विकसित करणे.
६. जे अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता आणि एकाच वेळी नवीन उपक्रमावर नियमन करेल अशा नियमांकरिता बौध्दीक समर्थन प्रदान करणे.
७. उत्पादन प्रक्रिया, उत्पादन आणि प्रक्रिया तंत्रज्ञान, बाजाराचे कल, सुरक्षा आणि गुणवत्तेचे मानके यासारख्या खाद्य प्रसंस्करण क्षेत्रातील ज्ञान भांडाराप्रमाणे कार्य करणे, इतरांमध्ये व्यवस्थापन पध्दतीचे आयोजन करणे.
८. अन्न प्रक्रिया समुहाचे तंत्रज्ञान अद्यायावत करण्यासाठी कार्य करणे
९. भारतीय विद्यमान संस्थांमधील सहयोग तसेच आंतरराष्ट्रीय संस्थाच्या सहकार्याने सहयोग करणे.

## **१.३२.३ भारतीय पीक प्रक्रिया आणि तंत्रज्ञान संस्था (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रॉप प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी) आयआयसीपीटी**

भारतीय पीकप्रक्रिया आणि तंत्रज्ञान संस्था (इंडियन इन्सिटटयूट ऑफ क्रॉप प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी - आयआयसीपीटी) भारत सरकारच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत एक स्वायत्त संस्था आहे. हे तंजावूर, तामिळनाडूमध्ये स्थित आहे. आयआयसीपीटीच्या मुख्य उपक्रमामध्ये देशभरातील हितधारकांच्या गरजा भागविण्यासाठी अन्न प्रक्रिया क्षेत्रातील शिक्षण, संशोधन आणि विस्तार करण्यासाठी हे चार वर्षाचे बी.टेक कार्यक्रम आणि दोन वर्ष एम.टेक कार्यक्रम चालवते.

पहिली एमटेक बॅच २०११ मध्ये झाली, पहिली बी टेक बॅच २०१३ मध्ये पदवीधर झाली.  पीएचडी कार्यक्रमही कार्यान्वित आहे. आयआयसीटीपीचे दोन क्षेत्रीय केंद्र आहेत. नवी दिल्लीतील एक आणि गुवाहाटीतील इतर भागांमध्ये भागधारकांच्या गरजा भागवण्यासाठी गुवाहाटी केंद्र देशाच्या उत्तर पुर्वेकडील क्षेत्राच्या गरजा पूर्ण करते. गुवाहाटी केंद्र आर्ट फूड प्रोसेसिंग बिझनेश इनक्युबेशन सेंटर आणि फूड दर्जाचे प्रयोगशाळेची निर्मिती केली जात आहे.

नवी दिल्ली केंद्र हे जम्मू कश्मिर, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तरप्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थान यासारख्या उत्तर भागातील प्रदेशांना पुरवठा करत आहे.  आयआयसीपीटीला एनएबीएलकडून खाद्य दर्जाची चाचणी प्रयोगशाळा, अन्न उत्पाद विकास प्रयोगशाळा, अन्न सुक्ष्मजीवशास्त्र प्रयोगशाळा आणि उच्च तंत्रज्ञान, अन्नप्रक्रिया उष्मायन केंद्र आणि अन्न अभियांत्रिकी प्रयोगशाळा मान्यता प्राप्त आहे.

उच्च तंत्रज्ञानासह आधुनिक आणि जागतिक स्तरावरील प्रयोगशाळांना सुसज्ज करून भारतीय पीक प्रक्रिया आणि तंत्रज्ञान संस्था ही प्रक्रिया, संरक्षण, मुल्यवर्धन, आणि प्रक्रिया आणि उत्पादनाच्या विकासादवारे उपयोजित उपयोगाची तंत्रज्ञानाची ओळख करून देते.

भारतीय पीकप्रक्रिया आणि तंत्रज्ञान संस्थाने घेतलेल्या संशोधनाचे विषय काळजीपूर्वक आणि दृष्टीकोनाने निवडले जातात. आयआयसीपीटी त्यांच्या संशोधनावर लक्ष केंद्रीय करते जसे की, विना विध्यंसक गुणवत्ता मूल्यांकन आणि फळे व भाज्यांचे वर्गीकरण, फळ व पिकांसाठी  निश्‍चितीचे निर्धारण,  कापणीसाठी परिपक्व होणारी फळे, फळे व भाज्यामधील अंतर्गत घटकांची ओळख पटविण्यासाठी,  शेतातील  शेतीचा विकास  पूर्व शीतीकरण आणि भाजीपाला धुवून स्वच्छ करून त्याची गुणवत्ता तपासण्याचे कार्य करते.

स्वदेशी तंत्रज्ञानाच्या ज्ञानावर आधारित खाद्यपदार्थ, संमिश्र धान्य खाद्यपदार्थ, अन्न प्रक्रिया प्रसंस्करण प्रवाहयुक्त प्रक्रिया सुधारणे, कोरडे मिश्रण वापरण्यासाठी  तयार करणे, इतर भारतीय पदार्थाकरिता पिठ, धान्ये, फळे, आणि भाज्या यांच्यावर आधारित नवीन खाद्यपदार्थाचा विकास, आरोग्यदायी  पदार्थ  बनविण्यासाठी प्रसंस्कृत पदार्थांचे  धोरण, प्रक्रियेसाठी नवीन उपकरणे विकसित करणे, बहुददेशीय प्रक्रियेसाठी सुकवणे, हाताळणी करणे, हातने सडून तांदूळ तयार करणे, साठवण हानी कमी करणे, बायोमासचा आर्थिक वापर करणे, उपउत्पादनाचे उद्योग आणि प्रक्रियेचा उपयोग करणे, अन्न प्रक्रिया संबंधित भागात कार्यक्रम संशोधन व विकास याशिवाय, संस्थेने अन्न प्रक्रिया तंत्रज्ञानात पदवीधर मास्टर आणि डॉक्टरेटची पदवी देवू  केली आहे.

### १.३२.४ भारतीय द्राक्ष प्रक्रिया महासंघ (इंडियन ग्रेप प्रोसेसिंग बोर्ड)

सरकारने जानेवारी २००९ मध्ये इंडियन ग्रेप प्रोसेसिंग बोर्डाची स्थापना करण्यास मान्यता दिली. भारतीय द्राक्ष प्रोसेसिंग बोर्डाचे प्रमुख उदिष्टये आहेत.

१. संशोधन आणि विकास, विस्तार, दर्जा सुधारणे, बाजार संशोधन आणि माहिती, भारतीय वाइनची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पदोन्नती यावर लक्ष केंद्रित करणे.

२. गुणवत्तेची व्याख्या आणि लेबल मानके, वाईनचे प्रमाणक आणि चांगले उत्पादन विश्लेषण आणि /आयएसओचे परीक्षण करण्यासाठी वाईन विश्लेषण, चाचणीसाठी सुविधा सेट करण्यासाठी.

३. सहकारी प्रयत्नला प्रोत्साहन देण्यासाठी सामान्यत: उत्पादक आणि मादक द्रव्य उद्योग यांच्यातील मागास आणि अग्रेसर संबंध.

४. भारतीय वाईन उद्योगाच्या विकासासाठी, नवीन तंत्रज्ञानातील / प्रक्रियेतील संशोधानासह आणि भारतीय वाईन उद्योगाच्या शाश्वत विकासास प्रोत्साहन देण्यासाठी एक दृष्टी, कृती योजना तयार करणे. त्यानंतर बोर्डाने पुण्यात मुख्यालय सुरू केले आहे. मंडळाच्या कार्यकारी समितीमध्ये एकूण १६ सदस्यांचा समावेश आहे.

### १.३२.५ राष्ट्रीय मांस आणि कुकूटपालन प्रक्रिया महासंघ (एनएमपीपीबी) [११]

एनएमपीपीबी एक स्वायत्त संस्था आहे. जी संस्था नोंदणी अधिनियम १८६० नुसार नोंदणीकृत आहे. मंडळाने ७/६, असोसिएशन ऑफ नगर पालिका व विकास प्राधिकरण , सिरी फोर्ट इंन्स्टिटयूशनल एरिआ, ऑगस्ट क्रांती मार्ग, नवी दिल्ली येथे भाडेतत्वावरील निवासस्थानापासून काम करणे सुरू केले, मांस आणि कुकूटपालन प्रक्रिया क्षेत्राशी संबंधित सर्व विषयाना संबोधित करण्यासाठी आणि हे उद्योग चालविण्यासाठी राष्ट्रीय संस्था म्हणून काम करते, आणि उद्योग व्यवस्थापन करते. मंडळाची स्थापना २७ फेब्रुवारी २००९ रोजी केली गेली होती, ज्यात १९ सदस्य व मुख्य कार्यकारी अधिकारी होते.

संपूर्ण मांस उद्योगाला प्रोत्साहन आणि नियमन करण्यासाठी बोर्ड उत्पादक /उत्पादक आणि मांस उत्पादनाच्या निर्यातदारांसाठी एकल खिडकी सेवा प्रदाता म्हणून कार्य करते. बोर्डाने एएमडीए इमारत, ऑगस्ट क्रांती मार्ग, नवी दिल्ली येथे खाद्य परीक्षण प्रयोगशाळेची स्थापना केली आहे. एनएमपीपीबी प्रयोगशाळेत विविध अन्न व

अन्न उत्पादनांशी संबंधित विविध सूक्ष्मजीवशास्त्रीय आणि भौतिक रासायनिक मापदंडाचे विश्लेषण करण्यासाठी उच्च तंत्रज्ञान साधने आहेत, एनएबीएल प्रत्यायन मिळविण्यासाठी मंडळ प्रयत्न करत आहे.

या प्रयोग शाळेच्या फायद्यासाठी आणि संशोधनासाठी त्याच्या सदस्यांना सवलतीच्या दराने प्रयोग शाळा उपलब्ध आहे. एनएमपीपीबीने सर्व समभागधारकांना मोठया प्रमाणात सहकार्य केले . भारतीय पिक प्रक्रिया तत्रंज्ञान संस्था (इंडियन इन्टिटयूट ऑफ क्रॉप  प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी - आयआयसीपीटी) सह संयुक्तपणे मंडळाने देशभरातील मांस कामगाराकरिता अनेक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले.

## १.३२.६ कृषी आणि प्रक्रियाकृत अन्न निर्यात प्राधिकरण (एपीईडीए)

डिसेंबर १९८५ मध्ये संसदेने मंजूर केलेल्या कृषी आणि प्रसंस्कृत खाद्य उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण अधिनिमाखाली भारत सरकारव्दारे कृषी आणि प्रसंस्कृत खाद्य उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण (एपीईडीए) स्थापन केला होता. हा कायदा १३ फेब्रुवारी १९८६ पासून भारत राजपत्रात जारी केलेल्या अधिसूचनेव्दारे लागू झाला आहे. असाधारण: भाग दोन (कलम.३ (II): १३.२.१९८६) प्राधिकरणाने प्रक्रियाकृत अन्न निर्यात प्रोत्साहन परिषद (पीएफईपीसी)ची जागा घेतली.

## १.३२.७ अपेडा (APEDA) खालील अनुसूचित उत्पादनांच्या निर्यात प्रोत्साहन आणि विकासाची जबाबदारी आहे.

१. फळे, भाजीपाला आणि त्यांची उत्पादन
२. मांस आणि मांस उत्पादने
३. कुक्कुट आणि कुक्कुट उत्पादने
४. दुग्ध उत्पादन
५. मिठाई , बिस्कीटे आणि बेकरी उत्पादने
६. मध, गूळ आणि साखर उत्पादने
७. कोकाआ आणि तिची उत्पादने, सर्व प्रकारची चॉकलेट
८. मदयार्क आणि अ-अल्कोहोलयुक्त पेय

९. तृणधान्य आणि तृणधान्य उत्पादने

१०. शेंगदाणे आणि अक्रोडचे तुकडे

११. लोणचे, पापड आणि चटणी

१२. फलोत्पादन आणि पुष्पहार उत्पादने

१३. वनौषधी आणि औषधी वनस्पती

या व्यतिरिक्त, एपीईडीएवर साखर आयात कमी करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. एपीईडीएने भारताच्या जवळजवळ सर्व कृषी संभाव्य राज्यांमध्ये आपली उपस्थिती नोंदवली आहे आणि कृषी उत्पादन निर्यातीसाठी आपल्या मुख्य कार्यलयादवारे, पाच प्रादेशिक कार्यालये आणि १३ उप कार्यालयांमध्ये उपलब्ध करून दिल्या आहेत.

### १.३३ मत्स्य व्यवसाय [१३]

भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत मत्स्य उद्योगाला महत्त्वाचे स्थान आहे. भारतातील महत्त्वाचे आणि वेगाने वाढणारे अन्न उत्पादन क्षेत्र आहे. भारताला मिळालेला समुद्रकिनारा विस्तृत आणि मत्स्य साधनसंपत्तीचा अगदी भिन्न अव्यक्त असे महत्व आहे. जो २ दशलक्ष चौरस मीटरचा अंतभार्व असलेला आहे. समुद्रातील खोल समुद्र मत्स्य व्यवसायासाठी  उपलब्ध करून दिलेले आहे, तसेच समुद्रकिनाऱ्यातील ७,५२० किलोमीटर आणि नद्यामधील २९००० किलोमीटर क्षेत्र व पाण्याचा साठा करुन कृत्रिम तळयातील क्षेत्र १.७ दशलक्ष हेक्टर एवढे आहे. तसेच जवळपास खारट पाण्याचे क्षेत्र १ दशलक्ष व तलाव याचे ०.८ दशलक्ष हेक्टर्स क्षेत्र यातील सर्व साधनसंपत्तीचा पुर्णपणे उपयोग करता येतो.

जगात मासे उत्पादनात भारताचा तिसरा क्रमांक लागतो. देशांतर्गत मासे उत्पादनात दुसरा क्रमांक लागतो. भारताच्या सामाजिक -आर्थिक विकासात मत्स्य व्यवसाय क्षेत्राचा मोठा वाटा आहे. किनाऱ्यावरील मोठया लोकसंख्येला रोजगार म्हणजे १ दशलक्ष कोळी लोकांना यावर जीवन व्यतीत करत असले तरी ते सामन्यत: पूर्णत: दारिद्रयाच्या रेषेवर जीवन जगत आहेत. हा उद्योग अंतर्गत उद्योगातही रोजगार निर्माण करतो. (मासे सुकवणे, विकणे इ.) या व्यवसायात ११ दशलक्ष लोकांना पुर्णपणे व अंशत: दुय्यम रोजगार दिला आहे. मत्स्यद्योगाने अन्नाची  पौष्टीक पातळी वाढते, अन्न पुरवठयात वाढत होते आणि विदेशी चलन प्राप्त होते.

सन १९८१ मध्ये भारताच्या मत्स व्यवसाय क्षेत्राने स्थुल देशांतर्गत उत्पन्नात १२३० कोटी रुपयांची भर घातली होती. ती सन २००२ मध्ये ३२,०६० कोटी रुपये एवढी होती. मत्स्योद्योगाचा भारताच्या जीडीपी तील हिस्सा १.२ टक्के होता आणि शेती जीडीपीतील हिस्सा ४.७ होता. समुद्र आणि देशातंर्गत मासे उत्पादन वार्षिक सरासरीने ६.५७ दशलक्ष इतके होते.

## १.३४ फळ प्रक्रिया उद्योगाची उणीव

भारतात दिवसेंदिवस फळबागांखालील क्षेत्र वाढत आहे. त्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची उणीव दिसुन येते. पण प्रक्रिया अभावी फळे वाया जातात. कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सावंत व डॉ. मेहता यांच्या मते प्रगत देशाच्या तुलनेने फळे व भाजीपाला प्रक्रियेच्या उद्योगात आपला देश खुपच मागे आहे, असेही त्यांचे मत आहे.

## १.३५ अन्न प्रक्रिया उद्योग भुमिका व उदिदष्टे [१४]

जुलै १९८८ मध्ये अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालयाची स्थापना केली. देशातील अन्नप्रक्रिया क्षेत्राला चालना व त्याचा विकास करण्याला महत्त्व दिले. बळकट आणि गतीमान अन्नप्रक्रिया क्षेत्र शेतीच्या विविधीकरणात व व्यापरीकरणात महत्त्वाची भुमिका पार पाडते. जीवनमान सुधारते, शेती उत्पादने मुल्य वाढविते, रोजगार वाढविते, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविते आणि शेती अन्नाच्या निर्यातीसाठी बाजारपेठ निर्माण करते.

अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालयाने अन्नप्रक्रिया उद्योगाशी संबंधीत धोरणे व योजनांची सुसुत्रीकरण व अंमलबजावणी केली. ज्यामध्ये सर्व देशभर यांना अग्रक्रम देण्यात आले, हे मंत्रालय सहायक म्हणुन कार्य करते. ज्यायोगे या क्षेत्रात मोठी गुंतवणुक आणता येईल आणि उद्योगाला मार्गदर्शन व मदत करता येईल. ही त्याची सर्वसाधारण उदीष्टे आहेत. यासाठी मंत्रालयाने शेती उत्पादनाचा चांगला उपायोग करणे व मुल्य वाढविणे, अन्नप्रक्रियेला उत्तेजन देणे, धोरणात मदत देणे, मुल्यनिर्मित निर्यातीला सुविधा देणे आणि शेतीपासुन ग्राहकांपर्यंत पुरवठयातील अंतर भरुन काढण्यासाठी आधारभुत संरचना निर्माण करणे असा आहे.

## १.३६ महत्त्वाची धोरणे [१५]

१. अन्नप्रक्रिया उद्योग हा रोजगार निर्माण करणारा उद्योग म्हणुन मान्य केला.
२. बहुसंख्य अन्नप्रक्रिया उद्योगांना परवाना मर्यादेतुन वगळण्यात आले.
३. पतपुरवठा सहन व्हावा यासाठी सरकारने अन्न प्रक्रिया उद्योगांना बँक कर्जासाठी अग्रक्रम क्षेत्राच्या यादीत घातले. नाबार्डने शेतीप्रक्रिया आधारभुत सरंचना व विपणन विकासासाठी १००० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले.
४. सन २००१-२००२ च्या अंदाजपत्रकात फळे व भाजीपाला प्रक्रियावरील अबकारी कर १६ टक्क्यावरुन शुन्य टक्क्यावर आणला.
५. काही वर्गातील अन्नप्रक्रिया उद्योगांना सन २००४-०५ च्या अंदाजपत्रकात उत्पन्न कराची सुट देण्यात आली.

सन २००७-०८ च्या अंदाजपत्रकात पुढील वित्तीय प्रोत्साहन देण्यात आले आहे.

अ: अन्न प्रक्रिया उद्योगातील यंत्रसामग्रीतील जकात कर ७.५ टक्केवरुन ५ टक्क्यापर्यंत कमी करण्यात आला.
ब: कच्च्या सूर्यफुल तेलावरील जकात कर ६५ टक्के वरुन ५० टक्के आणि शुध्द सुर्यफुल तेलावरील जकात कर७५ टक्के वरुन ६० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला.
क: शुध्द खाद्यतेलावरील विशेष अधिक कर ४ टक्क्यावरुन ३ टक्के घटविण्यात आला.

१० व्या योजनेच्या पहिल्या चार वर्षात अन्न प्रक्रिया क्षेत्राच्या सरासरी वृध्दी दर चालु किंमतीने १३.२५ टक्के होता आणि सन १९९९-२००० च्या किमतीने ६.७५ टक्के होता.

## १.३७ नियोजन योजना

१० व्या योजनेत मंत्रालयाने अन्नप्रक्रिया उद्योगाचे तांत्रिक प्रगती, आधुनिकीकरण आदीसाठी अनेक योजनांची अंमलबजावणी केली. यासाठी आधारभुत संरचना विकास, मानवी साधनसंपत्ती विकास, गुणवत्ता विकास व इतर प्रोत्साहनात्मक कार्यक्रम आखले. ११ व्या योजनेत या योजनांना मदत व प्रोत्साहन देण्यात आले. नियोजन मंडळाने यासाठी २५० कोटी २००७-२००८ च्या वार्षिक योजनेसाठी दिले. यासाठी भव्य अन्न उधान योजना, शीतगृहाची साखळी, सुरक्षितता इ.साठी अनेक सोई सुविधा निर्माण केल्या. ग्रामीण आधारभुत संरचना निर्माण करण्यासाठी

खाजगी क्षेत्राची मदत घेण्यात आली. शेती फलोद्यान आणि उत्पादनाची गुणवत्ता चांगली ठेवण्याचा प्रयत्न झाला. यासाठी शेतकरी प्रक्रियादार व किरकोळ विक्रेते यांना एकत्र आणुन शेती उत्पादन व विपणन यामध्ये साखळी निर्माण करण्यात होईल. आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. भव्य फुड पार्कने शेती व फलोद्योग तसेच सर्व अन्न प्रक्रिया उद्योग एकत्रित आणता येतील. ११ व्या योजनेत असे ३० भव्य अन्न उद्योगाने मेगा फुड पार्क निर्माण करण्याचे उदिष्ट होते. मात्र त्यामध्ये म्हणावे तसे यश प्राप्त करता आले नाही.

## १.३८ अन्न प्रक्रिया उद्योगावरील २०१५ मधील दृश्य १६

अन्न प्रक्रिया उद्योगासाठी दृश्य व्युहरचना कार्यात्मक योजना आखुन प्रक्रिया क्षेत्राची प्रचंड वाढ करण्याचे ठरविण्यात आले. नाशवंत अन्नाच्या प्रक्रियेची पातळी वाढविण्याचे उद्दिष्ट ६ टक्केवरुन २ टक्के केले आणि वर्धित मुल्य २० टक्केवरुन ३५ टक्के करण्याचे होते आणि जागतिक अन्न व्यापारातील हिस्सा १.६ टक्केवरुन ३ टक्के करणे, फळे व भाजीपालासाठी प्रक्रिया पातळी सध्याच्या २.२ टक्क्यावरुन सन २०१० मध्ये १० टक्के व २०१५ मध्ये १५ टक्के करण्याचे उद्दिष्टे होते.

## १.३९ अन्न प्रक्रिया उद्योगाचा क्षेत्रीय दृष्टीक्षेप

### १.३९.१: फळे आणि भाजीपाला प्रक्रिया

फळे आणि भाजीपाला प्रक्रिया उद्योगाची स्थापित क्षमता १ जानेवारी १९९३ मध्ये ११.०८ लाख टन होती. ती वाढुन १ जानेवारी २००६ मध्ये २१.१८ लाख टन आणि १ जोनवारी २००७ मध्ये २४.७४ लाख टन झाली. एकुण उत्पादनाच्या साधारण २.२० टक्के फळे व भाजीपालाचा वापर प्रक्रियेसाठी केला जात होता. अलीकडे काही वर्षात फळांचा रस, पल्प, टोमॅटो उत्पादन, भाजीपाला, गोठविलेली फळे, वाळलेली फळे, भाज्या इ. मोठया प्रमाणात वाढ होत आहे.

## १.३९.२ मांस आणि मांस प्रक्रिया १७

भारतात मांस आणि मांस प्रक्रिया क्षेत्र, कोंबडी, बदके या पाळीव पक्षांचे मांस हा वेगाने वाढणारा पशु पौष्टीक उद्योग आहे. सन १९९१ ते २००५ या काळात या उद्योगात १३ टक्के वाढ झाली. सन २००० मध्ये भारतात मासांचा दरडोई उपभोग ८७० ग्रॅम होता. तो २००५ मध्ये १.६८ किलोग्रॅम एवढा वाढला. तो सन २००९ पर्यंत २ किलोपर्यंत वाढण्याची अपेक्षा होती. म्हशीच्या मांसाचे उत्पादन वाढ त्यामानाने कमी आहे. सध्याची उत्पादन पातळी १.९ दशलक्ष मेट्रीक टन असुन वार्षिक निर्यात १० हजार मेट्रीक टनांपेक्षा कमी असते.

भारतीय ग्राहक ताजे मटण विकत घेतात. त्यांना प्रक्रिया केलेले किंवा गोठवलेले मटण फारसे आवडत नाही. त्या उलट उत्पादन मात्र अंदाजे १ लाख मेट्रीक टनापेक्षा अधिक आहे. पण त्यापैकी ४० ते ५० टक्केचाच उपभोग घेतला जातो. भारत पाच लाख मेट्रीक टन मासांपेक्षा अधिक मांसाची निर्यात होते. त्यामध्ये प्रमुख हिस्सा म्हशीच्या मांसाची आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय म्हैस मांसाला प्रचंड मागणी आहे, कारण ते चरबी नसलेल्या वैशिष्टयाचे व योग्य अवयव स्वरुपात असते. पुढील पत्रकात निर्यात मांस उत्पादन, परिणाम मुल्य दिलेले आहे.

जगात गोवंशीय मास निर्यातीमध्ये भारताचा पाचवा क्रमांक लागतो. भारतीय म्हशीचे मांस निर्यात वाढण्याची मोठी शक्यता आहे. अर्थात मांसाव्दारे अनेक रोग पसरण्याचा धोका असल्याने ग्राहक अधिक जागृत झाले आहेत. त्यामुळे निर्यातीकडे उत्पादकाचा कल वळत आहे.

## १.३९.३ मांस उत्पादन प्रक्रियेसाठी उत्पादन

सन १९७३ मध्ये स्थापन झालेल्या संस्थेकडून परवाना घ्यावा लागतो. या संस्थेचा मुख्य उद्येश म्हणजे मांस प्रक्रिया आणि अन्न प्रक्रिया उत्पादन व विक्रिचे नियमन करते. मांस निरोगी स्वच्छ व आरोग्यदायी असावे याची काळजी घेते. उत्पादनाच्या सर्व अवस्थेत गुणवत्तेचे नियंत्रण करते. मांस आणि मांस उत्पादनासाठी देशांतर्गत बाजारपेठांसाठी आणि निर्यातीसाठी तसेच या उद्योगाच्या विकासासाठी सरकार आवश्यक आधारभुत संरचना उभारण्याचा प्रयत्न करत आहे.

**कोष्टक १.७: अन्न प्रक्रिया उद्योगातील वार्षिक भाववाढ १८**

एप्रिल ते मार्च (%)

| घटक | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|
| वस्तू | ७.४ | ६.० | २.० | -२.५ |
| अन्न पदार्थ | ९.९ | १२.८ | ६.१ | ३.४ |
| कडधान्य | १३.५ | १२.८ | ३.६ | ०.६ |
| डाळी | १९.६ | -५.५ | ५.९३९.५ | |
| फळे अणि पालेभाज्या | ८.२ | २३.१ | ५.३ | -१.३ |
| अंडी मटन मच्छी | १४.० | १२.९ | २.४ | २.० |
| उत्पादीत केलेले अन्न पदार्थ | ८.१ | ३.२ | २.४ | २.० |
| डेअरीची उत्पादने | २.६ | २.४ | १०.६ | ३.६ |
| प्रक्रीयायुक्त हवाबंद डब्यातील उत्पादने | ३.२ | १४.५ | १.४ | -१.२ |
| भरडलेली धान्ये | ८.९ | ७.६ | ४.३ | २.१ |
| बेकरी उत्पादने | २.२ | ७.१ | ७.२ | ०.९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| साखर, खांडसरी अणि गुळ | ९.१ | -०.७ | -१.० | २.१ |
| खाद्य तेल | ९.१ | -०.७ | -१.० | २.१ |

स्त्रोत- राष्ट्रीय औदयोगिक  सर्वेक्षण - २०११-१२

कोष्टक क्रमांक १.७ मध्ये भारतातील अन्न प्रक्रिया उद्योगातील वार्षिक भाववाढ सन २०१२ -१३ ते २०१५-१६ एप्रिल - मार्च दरम्यानची आहे. सन २०१२-१३ मध्ये अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये वार्षिक  भाववाढीचा वेग ७.४ होता, तो घटुन सन २०१५-१६ मध्ये २.५ टक्के इतका झाला आहे. त्याचबरोबर सन २०१२-१३ मध्ये सर्वात जास्त भाव वाढ ही दाळीमध्ये १९.६ टक्के होती. त्याखालोखाल अंडी, मांस, आणि मासे यांची भाववाढ १४.० टक्के होती. तर सर्वात कमी भाववाढ वार्षिक दर हा दुग्ध उत्पादनांचा २.६ टक्के होता. त्या खालोखाल बेकरी उत्पादकांमध्ये २.२ टक्के भाववाढ नोंदवली आहे. परंतु या वर्षात सर्व अन्न व अन्नप्रक्रिया उद्योगातील भाववाढीचा वार्षिक दर घटला आहे.

**कोष्टक क्र.१.८: राज्यनिहाय अन्न प्रक्रिया उद्योग नोंदणी**

टक्केवारीमध्ये (%)

| अनु. क्र. राज्य | | एकूण उद्योग | | एकूण हिस्सा | |
|---|---|---|---|---|---|
| | | अन्न प्रक्रिया उद्योग | पेये | | |
| १ | आंध्र प्रदेश | ९०१८ | ३४१ | ९३५९ | २५.३८ |
| २ | अंदमान निकोबार | ४ | ० | ४ | ०.०१ |
| ३ | असाम | ११७२ | ४० | १२१२ | ३.२९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | बिहार | ६८२ | ३३ | ७१५ | १.९४ |
| ५ | चंदीगड | १८ | ५ | २३ | ०.०६ |
| ६ | छत्तीसगड | १०१३ | १५ | १०२८ | २.७९ |
| ७ | दादरा नगर हवेली | ८ | - | ८ | ०.०२ |
| ८ | दमण दीव | १२ | २३ | ३५ | ०.०९ |
| ९ | दिल्ली | १३९ | ६ | ८५ | ०.२३ |
| १० | गोवा | ४९ | ३६ | ८५ | ०.२३ |
| ११ | गुजरात | १७९१ | १३३ | १९२४ | ५.२२ |
| १२ | हरियाणा | ५७७ | ७३ | ६५० | १.७६ |
| १३ | हिमाचल प्रदेश | १४५ | २६ | १७१ | ०.४६ |
| १४ | जम्मु काश्मिर | १३२ | १८ | १५० | ०.४१ |
| १५ | झारखंड | १५४ | १५ | १६९ | ०.४६ |
| १६ | कर्नाटक | १८७५ | १०४ | १९७९ | ५.३७ |
| १७ | केरळ | १३८७ | ५० | १४३७ | ३.९० |
| १८ | मध्य प्रदेश | ७१२ | ४२ | ७५४ | २.०४ |
| १९ | महाराष्ट्र | २८३८ | २७५ | ३११३ | ८.४४ |
| २० | मणिपूर | १८ | - | १८ | ०.०३ |
| २१ | मेघालय | १४ | ४ | १८ | ०.०५ |
| २२ | नागालँड | १२ | - | १२ | ०.०३ |
| २३ | ओरीसा | ८२८ | ४७ | ८७५ | २.३७ |
| २४ | पुददूचेरी | ५६ | १४ | ७० | ०.१९ |
| २५ | पंजाब | २७०० | ८४ | २७८४ | ७.५५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २६ | राजस्थान | ६८३ | ९४ | ७७७ | २.११ |
| २७ | सिक्कीम | १० | ८ | १८ | ०.०५ |
| २८ | तमिळनाडू | ४९१२ | २७४ | ५१८६ | १४.७ |
| २९ | त्रिपुरा | ४९ | ६ | ५५ | ०.१५ |
| ३० | उत्तर प्रदेश | १९८८ | १२८ | २११६ | ५.७४ |
| ३१ | उत्तराखंड | ३५७ | २४ | ३८१ | १.०३ |
| ३२ | पश्चिम बंगाल | १५२७ | ७३ | १६०० | ४.३४ |

स्त्रोत- राष्ट्रीय औदयोगिक सर्वेक्षण - २०११-१२

कोष्टक क्रमांक १.८ मध्ये भारतातील राज्यनिहाय अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये नोंदणी झालेल्या स्थिती दाखविली आहे. सन २०११ - १२ मधील राज्यनिहाय अन्नप्रक्रिया उद्योग आणि विविध पेये यांची स्थिती दाखविली आहे. देशातील अन्नप्रक्रिया उद्योगाचा विचार करता तो संपुर्ण देशभर पसरलेला दिसुन येत आहे. देशात सर्वात जास्त अन्नप्रक्रिया उद्योगांची नोंदणी सन २०११-१२ मध्ये आंध्रप्रदेश मध्ये झाली आहे. ही नोंदणी देशातील एकुण अन्नप्रक्रिया उद्योगाच्या तुलनेत २५.३८ आहे. आंध्रप्रदेशमध्ये एकुण ९३५९ अन्न प्रक्रिया उद्योग सुरु आहेत. त्यामध्ये अन्न प्रक्रिया उद्योग ९०१८ तर ३४१ शीतपेये आहेत.

आंध्रप्रदेश नंतर देशात सर्वात जास्त अन्नप्रक्रिया उद्योगांची नोंदणी तामिळनाडू मध्ये आहे. तामिळनाडुचा हिस्सा १४.०७ टक्के आहे. त्याखालोखाल महाराष्ट्र आणि पंजाब या राज्यांचा क्रमांक लागतो. त्यांचा अन्न प्रक्रिया उद्योगातील हिस्सा ८.४४ टक्के व ७.५५ टक्के अनुक्रमे आहे. आंध्रप्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र व पंजाब या राज्यामध्ये देशातील एकुण अन्नप्रक्रिया उद्योगाचा विचार करता ६० टक्केहुन अधिक अन्नप्रक्रिया उद्योगांचे केंद्रीकरण या चार राज्यात झालेले आहे.

**कोष्टक १.९: क्षेत्रनिहाय अन्नप्रक्रिया उद्योग नोंदणी** [१९]

सन २००७-०८ ते २०११-१२

| उद्योग | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ |
| मटन | ७७ | ९० | ८५ | ११५ | १४६ |
| मासे, शिपजीवी, इतर जलचर प्राणी | ३४० | ३५२ | ३५९ | ४३६ | ३९० |
| फळे अणि पालेभाज्या | ७३५ | ७०९ | ८३२ | १०५२ | १०७८ |
| मेद, प्राण्यांची चरबी | २५१५ | २४२९ | २४२१ | ३३०७ | ३३९४ |
| दुग्ध | १०९६ | ११०० | १११२ | १४९३ | १६५३ |
| डाळ मिल | १२८०७ | १३४६४ | १३३९७ | १७७९२ | १८२४४ |
| स्टार्च अणि इतर उत्पादने | ४४२ | ५८९ | ६७० | ७५७ | ७६६ |
| बेकरी उत्पादने | ९५५ | ९९३ | १०५६ | १४५० | १३९९ |
| साखर | ७७८ | ७३३ | ७४४ | ८९५ | ९०६ |
| कोको, चॉकलेट, साखरेचे वेगवेगळे गोड पदार्थ, इतर कन्फेक्शनेरी | ४०४ | ४५६ | ४६६ | ५०९ | ५६० |
| शेवया, नुडल्स, कुसकूस अणि इतर पिष्टमय पदार्थ | ७३ | ६१ | ५१ | ८३ | ७५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शिजविलेले अन्न आणि डिशेस् | - | ४५ | १३९ | ३४३ | ४१६ |
| इतर खाद्य पदार्थ | ४०९१ | ४२९० | ४२२५ | ५११४ | ५१०१ |
| तयार पशु खाद्य | ५५५ | ५४७ | ६०६ | ६७७ | ७५५२८० |
| अर्करहीत पेय | २८० | २९१ | २९६ | ३२५ | ३७८ |
| वाईन | ६४ | ७९ | ६९ | ७४ | ७७ |
| सातूची भिजवून वाळवलेली सत्व दारू | १२० | ९६ | ११७ | १५४ | १४१ |
| मिनरल पाणी, मादक नसलेले थंड पेय | ८८७ | ८९६ | ८३४ | १२६४ | १४०१ |
| एकूण | २६२१९ | २७२२० | २७४७९ | ३५८३८ | ३६८८१ |

स्त्रोत- राष्ट्रीय औदयोगिक सर्वेक्षण - २०११-१२

कोष्टक क्रमांक १.९ मध्ये भारतातील राज्यनिहाय अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये नोंदणी झालेल्या उद्योगांची माहिती दिली आहे. क्षेत्रनिहाय अन्नप्रक्रिया उद्योगातील नोंदणी सन २००७-०८ ते २०११-१२ दरम्यानची आहे. सन २००७ -०८ मध्ये देशात एकुण २६ हजार २१९ अन्न प्रक्रिया उद्योगांची नोंदणी झाली होती. त्यापैकी मांस ७७, मासे ३४०, फळे आणि पालेभाज्या ७३५, वनस्पती आणि प्राणी तेल फॅट २५१५, दुग्ध १०९६ उद्योगांचा समावेश होता.

देशातील अन्नप्रक्रिया उद्योगांचा विस्तार आणि विकास सातत्याने होत आहे. सन २०११-१२ मध्ये देशात ३४८८१ अन्नप्रक्रिया उद्योगांची नोंदणी झाली आहे. मांस १४६, मासे ३९०, फळे आणि पालेभाज्या १०७८, वनस्पती आणि तेल आणि फॅट ३३९४, दुग्ध १६५३ होते. क्षेत्रनिहाय अन्न प्रक्रिया उद्योगाची नोंदणी सविस्तर कोष्टक क्रमांक १.४ मध्ये आहे.

**कोष्टक क्रमांक १.१० राज्यनिहाय अन्न प्रक्रिया उद्योगातील लोकसंख्या** २०

टक्केवारीमध्ये (%)

| अनु. क्र. राज्य | | एकूण उद्योग | | एकूण उद्योग | हिस्सा टक्केवारीमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| | | अन्न प्रक्रिया उद्योग | थंडपेय उद्योग | | |
| १ | आंध्र प्रदेश | २३७३६२ | २०५८९ | २५७९६५ | १४.५२ |
| २ | अंदमान निकोबार | १०७ | ० | १०७ | ०.०१ |
| ३ | आसाम | ८५८६७ | ३०९३ | ८८९६० | ५.०१ |
| ४ | बिहार | २२०६० | ३०६३ | २५१२३ | १.४१ |
| ५ | चंडीगड | ५३८ | २९४ | ८३२ | ०.०५ |
| ६ | छत्तीसगड | २३५४४ | २०३४ | २५५७८ | १.४४ |
| ७ | दादरा नगर हवेली | ४७३ | - | ४७३ | ०.०३ |
| ८ | दमन दीव | ५०६ | १२०८ | १७१४ | ०.१० |
| ९ | दिल्ली | १३०९७ | ४४६ | १३५४३ | ०.७६ |
| १० | गोवा | ५४०९ | १९८१ | ७३९० | ०.४२ |
| ११ | गुजरात | ९३१६५ | ३०६३ | ९६२२८ | ५.४२ |
| १२ | हरियाणा | ३१५१३ | ५५३८ | ३७०५१ | २.०९ |
| १३ | हिमाचल प्रदेश | १०३३६ | १८४८ | १२१८४ | ०.६९ |
| १४ | जम्मु काश्मिर | ५८४६ | १६२५ | ७४७१ | ०.४२ |
| १५ | झारखंड | ३४८७ | ४९१ | ३९७४ | ०.२२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | कर्नाटक | ९९२८२ | ८७८२ | १०८०६४ | ६.०८ |
| १७ | केरळ | १८०४०६ | ६०२५ | १८६४३१ | १०.४९ |
| १८ | मध्य प्रदेश | ३८४५१ | ४५०९ | ४२९६० | २.४२ |
| १९ | महाराष्ट्र | २०८९५० | १९७५५ | २२८७०५ | १२.८७ |
| २० | मणिपूर | ३०९ | - | ३०९ | ०.०२ |
| २१ | मेघालय | ३५३ | २३४ | ५८७ | ०.०३ |
| २२ | नागालँड | ११५ | - | ११५ | ०.०१ |
| २३ | ओरीसा | २२९०० | २१७४ | २५०७४ | १.४१ |
| २४ | पुददूचेरी | ४२३२ | ८६९ | ५१०१ | ०.२९ |
| २५ | पंजाब | ८५३२७ | ९४९३ | ९४८२० | ५.३४ |
| २६ | राजस्थान | ३०८५४ | ८११७ | ३८९७१ | २.१९ |
| २७ | सिक्कीम | १२१४ | ६५७ | १८७१ | ०.११ |
| २८ | तमिळनाडू | १७३१३० | १३२९८ | १८६४२८ | १०.४९ |
| २९ | त्रिपुरा | १५४९ | ११३ | १६६२ | ०.०९ |
| ३० | उत्तर प्रदेश | १४७९२५ | १७०८१ | १६५००६ | ९.२९ |
| ३१ | उत्तराखंड | २५५३५ | ३०११ | २८५४६ | १.६१ |
| ३२ | पश्चिम बंगाल | ७५३२१ | ७९५७ | ८३२७८ | ४.६९ |
| एकूण | | १६२९१६१ | १४७४८२ | १७७६६४३ | १००.०० |

स्त्रोत - राष्ट्रीय औदयोगिक सर्वेक्षण - २०११-१२

कोष्टक क्रमांक १.१० मध्ये भारतातील अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये असलेले मनुष्यबळ तसेच लोकसंख्या दाखविली आहे. सन २०११-१२ मध्ये अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये एकुण १७७६,६४३ गुतंवणूक झालेली दिसते. त्यापैकी १६२९,१६१ अन्न प्रक्रिया उद्योगात १४७,४८२ पेये उद्योगात होते. राज्यनिहाय अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये असणाऱ्या लोकसंख्येचा विचार करता, सर्वात जास्त लोक हे आंध्रप्रदेश राज्यातील आहेत. त्यांचा हिस्सा १४.५२ टक्के आहे.

त्या खालोखाल महाराष्ट्र राज्याचा क्रमांक लागतो. देशातील एकुण अन्नप्रक्रिया उद्योगातील लोकांपैकी १२.८७ टक्के लोक महाराष्ट्रात आहेत. त्यांची संख्या २२८,७०५ आहे. त्यापैकी २०८,९५० अन्न प्रक्रिया उद्योगात तर १९७५५ पेये उद्योगात सक्रिय आहेत. केरळ आणि तामिळनाडुमध्ये प्रत्येकी १.४९ टक्के लोक या उद्योग ात आहेत. थोडक्यात देशातील एकुण अन्न प्रक्रिया उद्योगातील लोकसंख्यापैकी ६० टक्के लोक हे आंध्रप्रदेश महाराष्ट्र, केरळ, तामिळनाडु आणि उत्तर प्रदेश राज्यातील आहेत.

## कोष्टक क्रमांक १.११ राष्ट्रीय उत्पन्नातील अन्न प्रक्रिया उद्योगाचे योगदान २१

कोष्टक क्रमांक १.११ मध्ये भारतातील राष्ट्रीय उत्पन्नातील अन्नप्रक्रिया उद्योगाचे योगदान दाखविले आहे. सन २००८-०९ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील अन्नप्रक्रिया उद्योगांचा हिस्सा १.५ टक्के होता, तो वाढुन सन २०११-१२ मध्ये १.६ टक्के इतका झाला आहे. परत २०१२ -१३ मध्ये तो १.५ टक्के इतका होता.

कोष्टक १.११ राष्ट्रीय उत्पनतील अन्नप्रक्रिया उद्योग ाचे योगदान

टक्केवारीमध्ये (%)

| अनु. क्र. | वर्ष | राष्ट्रीय उत्पनतील अन्नप्रक्रिया उद्योग ांचे योगदान |
|---|---|---|
| १ | २००८-०९ | १.५ |
| २ | २००९-१० | १.३ |
| ३ | २०१०-११ | १.४ |
| ४ | २०११-१२ | १.६ |
| ५ | २०१२-१३ | १.५ |

स्त्रोत - राष्ट्रीय औदयोगिक सर्वेक्षण - २०११-१२

## १.४० औद्योगिक धोरण २०१३

राज्य सरकारने अलिकडेच नवीन औद्योगिक धोरण २०१३ तयार केले आहे. धोरणाचा मुख्य उद्देश त्याच्या नेतृत्वाची स्थिती, निरंतर वाढ आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा आहे.

## १.४१ प्रोत्साहन योजना २०१३ २२

राज्य सरकारने औद्योगिक क्षेत्रासाठी प्रोत्साहन योजनेचे पॅकेज घोषित केले आहे. या योजनेत शीतीकरण गोदाम आणि शेती प्रक्रिया उद्योग (डेअरी, फळे व भाजी प्रक्रिया, धान्य प्रक्रिया, मासे प्रक्रिया, डबाबंदा खाद्यपदार्थ उपभोगतांचे पदार्थ, फळे व भाज्यांपासून मादक पेय) इतर उद्योगांव्यतिरिक्त हे निश्चित भांडवल, औद्योगिक प्रोत्साहन अनुदान (आयपीएस), वीज शुल्कापासून सूट, मुद्रांक शुल्क माफ, वीज दर अनुदान, एमएसएमईला तांत्रिक उन्नतीसाठी भांडवली अनुदानाशी संलग्न आर्थिक प्रोत्साहन देते, गुणवत्ता प्रमाणक इ. या सवलतींचे प्रमाण उद्योगाच्या उलाढालीचे आणि स्थानाच्या अनुसार बदलते.

## १.४२ शेती औदयोगिक योजना मसुदा २०१०

राज्यातील शेती प्रक्रिया उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी समुह आधारित दृष्टिकोनातून उचलण्यावर धोरणामध्ये स्पष्ट केले आहे. सूक्ष्म- समुह, एमएसएमई आणि मोठ्या प्रमाणातील बहूपातळीवरील प्रकल्पांसह एकाग्र प्रकल्पांना प्रोत्साहन दिले जाईल. या धोरणामध्ये बाजारपेठेतली विस्तारित सेवा, बाजार जोडणी, बाजाराचा विकास आणि नंतर उद्योग ासाठीच्या पायाभूत सोयीसुविधा, शेतकरी गटांची स्थापना आणि बळकटी यासारख्या गोष्टींचा समावेश आहे. अन्य काही केंद्रीत क्षेत्र असतील जसे की, अन्न गुणवत्ता आणि सुरक्षा, संशोधन व विकास, क्षमता निर्माण करणे आणि शेती पर्यटन विकसीत करणे.

## १.४३ द्राक्ष प्रक्रिया धोरण, २००१

या धोरणामुळे अबकारी कर व मुल्य वर्धित करामध्ये एक खिडकी योजनेला परवाना देणे इ. सारख्या अनिवार्य आहे, सारख्या इतर सुविधा असलेल्या सवलती देण्यात आल्या आहेत. अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालयाने

(एमएफपीआय) एक नवीन केंद प्रायोजित योजना (सीएसएस) सुरू केली आहे. राष्ट्रीय अन्न प्रक्रिया प्रकल्प (एनएमएफपी) १२ व्या योजनेत (२०१२-१३).

## १.४४ राज्यांमार्फत अंमलबजावणीसाठी २३

राष्ट्रीय अन्न प्रक्रिया प्रकल्पामध्ये (एनएमएफपी) राज्य आणि जिल्हा स्तरावर राष्ट्रीय मोहीम तसेच संबंधित मोहिमांची स्थापना करण्यात आलेली आहे. एनएमएफपी विविध योजनांच्या नियोजन, पर्यवेक्षण आणि देखरेखीच्या दृष्टीने मंत्रालयाच्या आवाक्याबाहेर लक्षणीय सुधारणा करू शकते.

- अन्न प्रक्रिया राष्ट्रीय मिशन अंतर्गत (एनएमएफपी) योजना
- अन्न प्रक्रिया उद्योगाच्या तंत्रज्ञानाचे उन्नतीकरण / आस्थापना / आधुनिकीकरण योजना
- फलोत्पादनासाठी शीतीकरण, मुल्य वर्धन व गोठवणूक तंत्रज्ञान योजना.
- मानव संसाधन विकास योजना (एचआरडी)
- अन्नप्रक्रिया तंत्रज्ञानमध्ये रनिंग डिग्री / डिप्लोमा / सर्टिफिकेट अभ्यासक्रमांसाठी पायाभूत सुविधांची निर्मिती.
- उद्योजकता विकास कार्यक्रम (इडीपी)
- अन्न प्रक्रिया प्रशिक्षण संस्था (एफपीटीसी)

## १.४५ ) जाहिरात उपक्रमांसाठी योजना २४

अ) सेमिनार / कार्यशाळा आयोजित करणे

ब) अभ्यास / सर्वेक्षण आयोजित करणे

क) प्रदर्शन प्रदर्शन / मंडळे

ड) जाहिरात आणि प्रसिध्दी

ई) तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी / अन्नप्रक्रिया / अन्नप्रक्रिया उद्योग आधुनिकीकरण

या वरील सर्व योजना नवीन प्रक्रिया युनिट्सची स्थापना करण्यासाठी आर्थिक साहाय्याच्या विस्तारास प्रोत्साहन देते, की जे तंत्रज्ञान अद्यावत आहे आणि देशातील अस्तित्वातील युनिट्सचे विस्तार समाविष्ट करते.

अन्नातील चव आणि रंग, मसाले, नारळ, मशरूम यासारख्या खाद्य प्रक्रियामध्ये अशा इतर कृषी-बागवानी क्षेत्रातील आहे.

**पात्र क्षेत्रे :**

१. फळे आणि भाज्या
२. दूध उत्पादने
३. मांस
४. कुकूटपालन
५. मत्स्यपालन
६. तेल बियाणे उत्पादने
७. तृणधान्य आणि इतर ग्राहक खाद्य उत्पादने
८. तांदळाचे बंधन
९. पिठाची गिरणी
१०. दाळ प्रक्रिया

## १.४६ पात्र संघटना सर्व अंमलबजावणी करणाऱ्या संस्था[२५]

१. शासन

२. पी.एस.यु.

३. एनजीओ

४. सहकारी संस्था

५. खाजगी क्षेत्र

६. अन्न प्रक्रिया उद्योग च्या उभारणीत / विस्तार / आधुनिकीकरणामध्ये गुंतलेली व्यक्ती आर्थिक मदत देण्यास पात्र आहे.

## १.४७ आर्थिक मंजुरी अन्न प्रक्रिया उद्योग च्या घटकांना आर्थिक सहाय्य अनुदान सहाय्य स्वरूपात देणे [२६]

- संयंत्र आणि यंत्र सामग्री बांधकामाच्या खर्चाच्या जास्तीत जास्त २५% किंवा ५० लाख रूपयांपर्यंत

- शीत चेनसाठी योजना, अफलोत्पादनांसाठी मुल्य, अतिरिक्त आणि संरक्षणाचा पायाभूत सुविधा योजनेसाठी योजनांची तरतूद एकत्रित करणे इ.

- संपूर्ण शीतीकरण प्रक्रिया

- परिरक्षण पायाभूत सुविधा

- उत्पादन थेट शेतामधून ते बाजारपेठे पर्यंत

- उत्पादक आणि बाजारपेठांचे समूह तसेच उत्पादन साखळी आणि शीतीकरण साखळी

- उत्पादन वर पूर्व-थंड सुविधा

- एकात्मिक शीतीकरण प्रकल्पांसाठी मदत

### १.४७.१ ठळक वैशिष्ट्ये

१. वज्र पॅकिंग, प्री-कुलिंग, कंट्रोलिड एटमॉस्फिअर (सीए) / सुधारित वायुमंडळ / (एमए) कोल्ड स्टोरेज सामान्य संचयन आणि आयक्यूएफ यासारख्या सुविधा असलेल्या शेतकऱ्यांकरिता किमान प्रोसेसिंग सेंटरची सोय करून देणे.

२. पूर्व शितीकरण वाहन, आणि बिगर फलोत्पादन उत्पादन वाहतूकीसाठी योग्य शीत ट्रक.

३. बहूउत्पादन आणि शितीकरण गोदामे / विविध प्रकारची डबाबंद पदार्थांची सुविधा असलेली वितरण केंद्रे, उपचार केंद्र, आणि उत्पादन क्षेत्रावर शितीकरण सुविधा इ.

### १.४७.२ विविकरणाची सुविधा

आर्थिक सहाय्य मिळविण्यासाठी, वरीलपैकी कोणत्याही दोन घटकाची स्थापना करणे आवश्यक आहे. कार्यरत सुविधा लक्षात घेता, विविकरणाची सुविधा अनुदान मिळविण्यासाठी फक्त एक बाजू म्हणून विचार केला जाऊ शकतात.

### १.४७.३ पात्र क्षेत्रे

फळ उत्पादनांशी संबंधित एकात्मिक शितीकरण मुल्य वर्धन आणि संरक्षण सुविधा प्रकल्प जसे की:

१. दुग्धशाळा - सर्व दूध आणि दुग्धजन्य पदार्थ इ..
२. मांस - लाल मांस, पांढरे मांस, डुकराचे मांस, लॅब, मटन, कुकूटपालन, मांस आणि त्यांची प्रक्रिया उत्पादने इ.
३. शेती आणि समुद्री उत्पादने जसे समुद्री खाद्य, मासे, कोळंबी आणि त्यांची प्रक्रिया उत्पादने इ.

### १.४८ आर्थिक अनुदान

संयंत्र आणि यंत्रसामग्रीच्या एकूण खर्चापैकी ५०% आणि तांत्रिक नागरी बांधकामासाठी जास्तीतजास्त १००० रू. च्या सहाय्याने आर्थिक सहाय्य (अनुदान)

### १.४९ मानव संसाधन विभागासाठी योजना (एचआरडी) [२७]

अन्न प्रक्रिया उद्योग हे भारताच्या विकासासाठी गंभीर आहे, कारण ते अर्थव्यवस्थेच्या दोन खांबांच्या विरूध्दचे एक निश्चित संकेतस्थळ आणि सिग्नेबिलिटी स्थापित करते. उद्योग आणि कृषी हे आधुनिक तंत्रज्ञानाचा व विस्तीर्णपनाचे आणि प्रबंधनाचे आणि मार्केटिंग करण्याचे नवीन मार्ग भविष्यातील जागतीक स्पर्धेला चालना देण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या अन्नप्रक्रिया उद्योगाना आवश्यक आहे. अन्नप्रक्रिया तंत्रज्ञानातील पदवी / पदविका अभ्यासक्रमांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करते आहे.

## १.४९.१ उद्दिष्टे

प्रशिक्षित मनुष्यबळासाठी (उद्योजक, व्यवस्थापक, तंत्रज्ञ, कुशल श्रमिकांसह) अन्नप्रक्रिया उद्योगाची वाढती गरज पूर्ण करणे आणि जागतिक स्पर्धासदृश्य सामना करण्यासाठी नवीनतम तंत्रज्ञान व वैविध्यपूर्णता आणि व्यवस्थापनास आणि जाहिरात करण्याच्या नवीन पध्दतींचा विचार करण्याची गरज आहे.

## १.४९.२ पात्रता

सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्था / महाविद्यालये जरी शासकीय खात्यामध्ये आहेत सेक्टर किंवा खाजगी क्षेत्र अनुदान सहाय्यसाठी पात्र असेल. अन्नसुरक्षा विज्ञान / ३ वर्ष बीएससी / २ वर्ष एमसीसी खाद्य तंत्रज्ञान किंवा खाद्य विज्ञान खाद्य प्रक्रिया / १ वर्ष पदव्युत्तर डिप्लोमा किंवा आहार तंत्रज्ञान / खाद्यपदार्थ पदविका अभ्यासक्रम प्रक्रिया / खाद्यपदार्थ अभ्यासक्रम तसेच उन्नतीसाठी आर्थिक मदत करण्यास पात्र असेल.

## १.४९.३ सहाय्याचे प्रमाण

पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी जास्तीत जास्त ७५ लाख रूपयांची मदत: तांत्रिक / शैक्षणिक पुस्तक / नियतकालिके ऑनलाईन प्रकाशनांचा समावेश, प्रयोगशाळा उपकरणे, वनस्पती शास्त्र इत्यादी विद्यापीठे / संस्थांना अधिक जबाबदार बनविण्यासाठी, पायाभूत सुविधांची निर्मिती हे या संस्थांचे भाग आहे. जमीन, इमारत आणि मनुष्यबळ आणि अन्य सर्व आवर्ती खर्चाच्या स्वरूपात असेल. तांत्रिक / शैक्षणिक पुस्तके आणि संबंधित विषयांवरील ई-जर्नल्स / मासिके यासह जर्नल्सकरिता सबस्क्रिप्शनची रक्कम १००% उपकरण खर्चापेक्षा जास्त नसावी. ७५ लाख रूपयांची जास्तीत जास्त रक्कम दोन समान हप्त्यांत दिली जाईल.

## १.४९.४ उद्देश

उद्योजक विकास कार्यक्रमाचे उद्दिष्टे:

१. प्रशिक्षणार्थींना अन्न आणि शेती-प्रक्रियांमध्ये व्यावसायिकरित्या व्यवहार्य उद्योग स्थापन करण्यास सक्षम करणे.
२. अन्नप्रक्रिया उद्योगासाठी संधी उपलब्ध करून देणे व आर्थिक सहाय्य देणे.

३. अनुरक्षण सेवा उपलब्ध करून देणे त्यांना बँका / वित्तीय संस्थांकडून कर्ज सुविधा उपलब्ध करून देणे किंवा विकास संस्था / स्त्रोत उपकरणे, कच्चा माल इ. / त्यांच्या उत्पादनांना बाजारातील विक्रीचे जाळे स्थापन करण्यास आणि अन्नप्रक्रिया घटक चालविण्यासाठी संभाव्य जोखीम घटक तयार करून देणे.

### १.४९.५ योग्य संघटना

केंद्र / राज्य सरकार / संघटना, संशोधन आणि विकास संस्था, विद्यापीठे इत्यादी सारख्या राष्ट्रीय पातळीवरील संस्था

उद्योजकता विकास व्यावसायिक संस्था

राज्य सरकार / वित्तीय संस्थांद्वारे स्थापन राज्यस्तरीय सल्लागार संस्था

### १.५० उद्योग संस्था / संघ

ईडीपीचे आयोजन करण्यामध्ये व्यावसायिक योग्यता आणि अनुभव असलेले प्रतिष्ठित बिगर सरकारी संस्था. आर्थिक सहाय्य ईडीपीसाठी रू. २ लाख प्रत्येक ईडीपी राज्यानुसार फूड प्रोसेसिंग ट्रेंनिंग सेंटर (एफपीटीसी) च्या माध्यमातून प्रदान करण्यात येईल.

स्थानिक उद्योजकांचा विकास आणि स्थानिक उत्पादित कच्च्या मालाचा वापर करून अन्न उत्पादनांच्या प्रक्रियेसाठी तंत्रज्ञान हस्तांतरण आणि अशा उत्पादन आणि प्रशिक्षण केंद्रात हँड-ऑन अनुभव प्रदान करणे, तर अनुसूचित जाती-जमाती / इतर मागासवर्गीय आणि महिला अल्पसंख्यांक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येते.

### १.५०.१ पात्रता

केंद्रीय किंवा राज्य सरकारी संस्था शैक्षणिक व प्रशिक्षण संस्था, शाळा आणि महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, एफपीटीसी स्थापित करण्यासाठी अनुदान पात्र असेल, एफपीटीसी प्राथमिक स्वरूपात त्या क्लस्टरमध्ये मंजूर करण्यात येतील, जी ईडीपीएससाठी निवडली गेली आहेत. अन्नप्रक्रिया उद्योगांत स्वयंचलित रस्ता अंतर्गत १००% एफडीआय परवानगी आहे. भारतातील उत्पादित किंवा अनुत्पादित खाद्य उत्पादनांच्या संदर्भात ई-कॉमर्सच्या माध्यमातून व्यापार करणाऱ्या सरकारी मान्यता मार्गाने १००% एफडीआय परवानगी आहे.

## १.५०.२ क्षेत्रीय धोरण (Sector Policy)

भारतीय रिझर्व्ह बँक शेअरींग सेक्टर लेंडिंगसाठी (पीएसएल) अन्न व शेती-आधारित प्रोसेसिंग युनिट्स आणि शेतीविषयक कृती अंतर्गत कोल्ड चेन वर्गीकृत केले आहे. बँकिंग प्रणालीकडून प्रति १५.३८ दशलक्ष डॉलर्सची मंजूरी मर्यादित केली गेली आहे. यामुळे उद्योजकांना अन्नप्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी आणि क्षेत्रातील गुंतवणूकीला आकर्षिक करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पतपुरवठा मिळणार आहे.

वित्त अधिनियम, १९९४ च्या कलम ९३ चया कलम ९ अंतर्गत जारी केलेल्या अधिसूचना ३/२०१३ च्या दिनांक १ मार्च २०१३ आणि ६ मार्च २०१५ च्या दिनांक ०६/१३/२०१५ च्या सुधारित सूचनेनुसार सेवा कर सवलत रेल्वे व वाहने किंवा रस्त्याद्वारे अन्नसामग्री च्या वाहतूकीस सूट मर्यादित असेल तर भात व डाळी, पीठ, दूध आणि मीठ यासारख्या अन्नधान्य वाहतूकीस मर्यादित केले जाईल.

कृषी उत्पादनांच्या वाहतूक कलम ९३ अध्याय ५ अंतर्गत जारी करण्यात आलेली अधिसूचना ३/२०१३ दिनांक ०१ मार्च २०१३ आणि ६१२०१५ दिनांक १ मार्च २०१५ पासून सुधारित सेवा कर अधिसूचना क्रमांक २५/२०१२ सेवा कर अधिसूचना क्रमांक २५/२०१२ दिलेली आहे. वित्त कायदा, १९९४ सेवा करामधून सवलत देण्याची शक्ती).

अधिक रोजगार निर्मितीसाठी, आयकर कायद्याच्या कलम ८ ओजे जेएएच्या तरतुदींनुसार किमान १०० कामगारांची पात्रता मर्यादा ५० वरून कमी करण्यात आली आहे. (१ फेब्रुवारी ०१/०४/२०१६).

वित्त अधिनियम २००५ च्या सातव्या अनुसूचीमध्ये ५% पेक्षा अधिक अबकरी करावरील शुल्क लागू असलेल्या जल, खनिज पाण्याची आणि वायुगळती पाण्याची, ज्यामध्ये जोडलेली साखर किंवा इतर मधुर पदार्थ किंवा फ्लेवडर्स समाविष्ट आहे.

## १.५१ संशोधनाची उद्दिष्टे

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टेखालील प्रमाणे आहेत.

१. अन्न प्रक्रिया उद्योग ांच्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करणे
२. अन्न प्रक्रिया उद्योग ांतील कामगारांची आर्थिक परिस्थिती अभ्यास करणे
३. सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ांचा भौगालिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे
४. अन्न प्रक्रिया उद्योग ांतील अडचणींचे परिक्षण करणे
५. अन्न प्रक्रिया उद्योग ांतील अडचणींवर उपाय योजना सुचविणे

## १.५२ गृहितके

संशोधनाची दिशा निश्चित होण्यासाठी संशोधन समस्या एक संभाव्य उत्तर शोधले जाते, समस्यांचे असे संभाव्य उत्तर आपणास अध्ययन विषयाच्या एखादया पैलूमूळे सूचित होते. त्याचे विधानामध्ये रुपांतर केले जाते. त्यास गृहितक म्हणतात. ही गृहितके सैध्दातिंक दृष्टया स्पष्ट, सोपी आणि विशिष्ट समस्येच्या बाबतीत निरिक्षण करण्याच्या दृष्टीने योग्य असते. शिवाय संशोधनातून तांत्रिक द्रष्टीने सुसंगत असे निष्कर्ष काढले जातात. त्याचा निर्णय व धोरण आखण्यास उपयोग होतो.

१. सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ाचा विकास असमतोल झाला आहे.
२. सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ाचे केंद्रीकरण प्रामुख्याने सोलापूर शहर आणि पंढरपूर तालुक्यात झाले आहे.

## १.५३ अभ्यास विषयाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनामध्ये सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ाचा अभ्यास करण्यात आला आहे, सदर संशोधनाची व्याप्ती ही फक्त सोलापूर जिल्हयापुरती मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधन सोलापूर जिल्हयातील चालू असलेल्या अन्न प्रक्रिया उद्योग ापुरते मर्यादित आहे, संशोधनामध्ये सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ांचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

### १.५४  माहितीचे संकलन

अन्न प्रक्रिया उद्योग ाची प्राथमिक माहिती ही प्रत्यक्ष अन्न प्रक्रिया उद्योग ांना भेट देऊन प्रश्नावलीच्या माध्यमातून विविध चलांची माहिती संकलित करण्यात आली आहे, त्याच बरोबर दुय्यम माहिती ही सोलापूर जिल्हा सामाजिक आर्थिक अहवाल सन २००६ ते २०१५ पर्यंतचा उपयोग करण्यात आला आहे.

आवश्यक असणारी दुय्यम साधनसाम्रीचे संकलन प्रामुख्याने जिल्हा उद्योग  केंद्र आणि वार्षिक अहवालातून तसेच संदर्भ ग्रंथ, मासिके, पाक्षिके, इंटरनेट, दैनिके त्याचबरोबर या विषयावर आगोदर झालेले संशोधन प्रबंध तसेच भारत सरकारच्या आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रसिध्द झालेल्या वेगवेगळया अहवालांचा आधार घेण्यात आला आहे.  शिवाय काही माहिती मिळविण्यासाठी अधिकऱ्यांच्या मुलाखती, पदाधिकऱ्यांच्या मुलाखती, नागरिकांशी संवाद, सबंधित तज्ञांशी चर्चा आदी मार्गाचाही अवलंब केला आहे.

### १.५५  माहितीचे पृथ्थकरण

अभ्यासासाठी प्राप्त झालेल्या माहितेचे पृथ्थकरण करण्यासाठी वेगवेगळया सॉफटवेअरचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये एम.एस.एक्सेल आणि एस.पी.एस.एस चा समावेश करण्यात आला आहे.  त्याचबरोरब प्राप्त सांख्यकीय आकडेवारीच्या आधारे योग्य विश्लेषणासाठी  सरासरी, प्रचारण गुणांक, विचलन गुणांक, संयुक्त वृध्दीदर, सहसबंध आणि साधा वृध्दीदर आणि टक्केवारी यासारख्या संख्याशास्त्रीय साधनांचाही वापर करण्यात आला आहे.

### १.५६ नमुना निवड

सोलपूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ाचा अभ्यास करण्यासाठी सहेतूक नमुना निवड पध्दतीने निवडण्यात आला आहे, सोलापूर जिल्हयाचा तालुकानिहाय विचार करता सोलापूर शहरामध्ये आणि बाकीच्या तालुक्यांमध्ये एकूण ३८१ उद्योगांची नोदंणी झालेली दिसून येते.

**कोष्टक क्रमांक १.१२  सोलपूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ाची नोंद**

| अ. क्र. | एकूण तालुके | संख्या | चालू उद्योग ांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | उत्तर सोलापूर | १२६ | ८६ |
| २ | दक्षिण सोलापूर | १४ | १४ |
| ३ | मोहाळ | ३० | २२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | बार्शी | ३५ | ११ |
| ५ | अक्कलकोट | १५ | ०९ |
| ६ | माढा | १५ | १२ |
| ७ | माळशिरस | १५ | ११ |
| ८ | मंगळवेढा | ०८ | ०८ |
| ९ | करमाळा | ११ | ११ |
| १० | सांगोला | ०९ | ९ |
| ११ | पंढरपूर | १२३ | ६० |
| **एकूण** | | **३८१** | **२५३** |

स्त्रोत - जिल्हा उद्योंग केंद्र, सोलापूर. २००७ - २०१३

सोलापूर जिल्हयामध्ये सन २०१३ पर्यंत ३८१ (२५३) इतक्या अन्न प्रक्रिया उद्योग ाची नोदंणी झाली आहे, त्यापैकी २५ % (टक्के) म्हणजे ६३ अन्न प्रक्रिया उद्योग घटक हे सहेतूक नमुना निवड पध्दतीने निवडले आहे, जे की सध्य स्थितीमध्ये उत्पादनक्षम रित्या कार्यक्षम आहेत. या उद्योग ांची निवड करत असताना पुढील निकषांचा विचार करण्यात आलेला आहे जसे की, ज्या उद्योग ांचे उत्पादन सरासरीपेक्षा जास्त प्रमाणात आहे, इतर उद्योग ांच्या तुलनेत गुतंवणूकीचे प्रमाण अधिक तसेच मनुष्यबळाची आणि कामगारांची संख्या मोठया प्रमाणात आणि वार्षिक उलाढाल मोठया प्रमाणात होते, अशा उद्योग ांची निवड करण्यात आलेली आहे, त्या उद्योग ांची व उदयोजकांची माहीती पुढील प्रमाणे दिलेली आहे.

## १.५७ कालखंड

सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उदयागाचा अभ्यास करण्यासाठी सन २००७ ते २०१३ हा कालखंड निश्चित करण्यात आला आहे.

## १.५८ संख्याशास्त्रीय साधने

संशोधनासाठी संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी, शेकडा बदल, आकृती आणि कोष्टक यांचा योग्य त्या पध्दतीने उपयोग करण्यात आला आहे.

## १.५९ संशोधनाचे महत्त्व

औद्योगिक क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कोणत्याही देशाच्या औद्योगिकरणास अन्यन साधारण महत्त्व असते. भारतासारख्या विकसनशील देशामध्येसुध्दा आर्थिक विकास साधण्यासाठी औद्योगिकरण अत्यंत आवश्यक आहे. परंतु औद्योगिक विकास किती झाला या बरोबरच हा विकास सर्वत्र समान प्रमणावर झ ालेला आहे किंवा नाही या गोष्टीला अत्यंत महत्त्व आहे. औद्योगिक विकासाबाबत आज प्रत्येक देशामध्ये आणि राज्यांमध्ये जागरुकता आहे. त्याला आपले महाराष्ट्र राज्य ही अपवाद नाही. आपल्या महाराष्ट्राचा औद्योगिक विकास समप्रमाणात झालेला नसल्यामुळे म्हणजे काही भाग विकसीत तर त्याच बाजुला काही भाग अविकसीत (कमी विकसीत) ही कमालीची प्रादेशिक विषमता अभ्यासण्याकरीता अनेक अहवाल सादर केले आहेत. बऱ्याच उपाययोजनाही सुचविल्या परंतु महाराष्ट्रातील औद्योगिक विकासामध्ये असणारा प्रादेशिक असमातोल अजुनही बऱ्याच प्रमाणात दिसुन येतो.

औद्योगिक विकासामध्ये असणारा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी विविध पंचवार्षिक योजनामध्ये निधीच्या वाटपाबाबत अनेक उपाययोजना करुनही हा असमतोल कायमच असल्याचे सरकारी आकडेवारीवरुन स्पष्ट होते. बऱ्याच उपाययोजना करुनही हा असमतोल कमी न होण्या मागच्या कारणांचा शोध घेणे फार आवश्यक आहे. या विषयाच्या सखोल अभ्यासावरुन व संशोधनावरुन तसेच येणाऱ्या निष्कर्षावरुन केंद्र व राज्य सरकारला आपल्या निधीच्या विकासात्मक कार्याच्या वाटपाकरीता, प्रादेशिक असमतोल दूरकरण्याकरीता निर्णय घेण्यास मदत होईल.

महाराष्ट्रामध्ये विविध प्रदेशाच्या विकासाकरीता स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. ही विकास मंडळे आपली कार्य किती कार्यक्षमपणे करतात यावर विचार करुन अभ्यास करुन त्या संदर्भात योग्य ते उपाय सुचविण्यात आली आहेत.

## १.६० सारांश:-

सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ाच्या अभ्यासासाठी कोणत्या घटकाची निवड करण्यात आली आहे, विषयाची पार्श्वभूमी, विषय निवडण्याचे कारण आदी गोष्टींची पार्श्वभूमी या प्रकरणात देण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अन्न प्रक्रिया उद्योग ातील लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या कोणत्या आहेत, तसेच आर्थिक समस्यांची पार्श्वभूमी देण्यात आली आहे. त्यामुळे विषयाचे गांभीर्य समजण्यास उपयुक्त होते.  याचा विचार करून सदर प्रकरणात मांडणी करण्यात आली आहे.

## १.६१ प्रकरणाची रूपरेषा

प्रस्तुत प्रबंधात प्रकरणांचे खालीप्रकारे नियोजन केले आहे.

**प्रकरण पहिले: प्रस्तावना व संशोधन पध्दती**

प्रस्तावना, अन्न प्रक्रिया उद्योगाची गरज, अन्न प्रक्रिया उद्योगात १००% विदेशी गुंतवणुक, अन्न प्रक्रिया उद्योग आणि रोजगार, अन्न प्रक्रिया उद्योग, अन्न प्रक्रिया उद्योगाचे प्रकार, मसाले, फळ प्रक्रिया, दुग्ध प्रक्रिया, शीतगृहे आणि गोदामे, अनुदान, प्रशिक्षण, भारतातील अन्न प्रक्रिया उद्योगाची स्थिती , कृषी उत्पादन, अन्न प्रक्रिय उद्योग नोंदणी, क्षेत्रनिहाय राज्यनिहाय अन्न प्रक्रिया उद्योग नोंदणी, राज्यनिहाय अन्न प्रक्रिया उद्योगातील लोकसंख्या, राष्ट्रीय उत्पन्नातील अन्न प्रक्रिया उद्योगाचे योगदान, अन्न प्रक्रिया उद्योगाची स्थिती, अन्न प्रक्रिया उद्योगातील थेट विदेशी गुंतवणुक, मुख्य उत्पादनाचे होणारे नुकसान, संशोधन पध्दती, संशोधनाचे महत्त्व व समस्या , संशोधनाची गृहिते, संशोधनाची उददीष्टे, माहितीचे संकलन, माहितीचे पृथ्थकरण, सारांश, प्रकरणाची रूपरेषा इत्यादी घटकांचा अभ्यास केला आहे.

**प्रकरण दुसरे: संशोधन साहित्याचा आढावा**

प्रस्तुत प्रकरणात संबंधित विषयाच्या अनुषंगाने प्रसिध्द झालेले विविध शोधनिबंध, लेख, संदर्भग्रंथ, संशोधन प्रकल्प, अप्रकाशित पीएचडी प्रबंध, लघुप्रबंध, अन्न प्रक्रिया उद्योगाविषयाशी संबंधित शासकीय तसेच संस्थाव्दारे प्रकाशित संशोधन अहवाल, शासकीय प्रकाशित साहित्य, विषेशत: शासकीय स्तरावर नेमण्यात आलेल्या समित्यांचे अध्यायन अहवाल इत्यादींचा अभ्यासाचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण तिसरे: सोलापूर जिल्हयाचा समग्र आढावा**

प्रस्तुत प्रकरणात सोलापूर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक पार्श्वभूमी, जिल्हयाचे क्षेत्रवार उत्पन्न, लोकसंख्या , धर्मनिहास आणि जातीनिहाय लोकसंख्या, लोकसंख्येची घनता, स्त्री पुरूष गुणोत्ततर, लोकसंख्येचा कामातील सहभाग, साक्षरता , शैक्षणिक स्थिती, दारिद्रय , सार्वजनिक वितरण व्यवस्था, आरोग्यविषयक

उपलबध सोई सुविधा, सुविधा, मानव विकास निर्देशांक, प्रशासकीय रचना, कामगार व रोजगार, धार्मिक स्थळे व पर्यटन इत्यादीं घटकांचा अभ्यास केला आहे.

**प्रकरण चौथे : सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ाच्या अर्थिक परिस्थितीचे विश्लेषण**

प्रस्तुत प्रकरणात प्राथमिक माहितीच्या आधारे सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ातील लोकांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास करून समस्यांचा शोध घेवून अनुसूचीदवारे त्यांची विस्तृत मांडणी केली आहे.

**प्रकरण पाचवे: निष्कर्ष व शिफारशी**

प्रस्तुत प्रकरणाचा संशोधन विषयाच्या उदिष्ठानुसार निष्कर्ष काढलेले आहेत. तसेच संशोधनातून समोर आलेल्या अन्न प्रक्रिया उद्योग ांना सामारे जावे लागत असलेल्या समस्यांचा शोध घेतला असून त्या समस्यांचे निराकारण करण्यासाठी महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत.

**संदर्भ व परिशिष्ठ**

प्रस्तुत प्रकरणामध्ये पूर्ण संशोधनासाठी लागलेल्या संदर्भग्रंथाची सूची देण्यात आली आहे, तसेच परिशिष्टामध्ये प्रश्नावली देण्यात आली आहे.

## १.६२ प्रकरणांचे वर्गीकरण

१. प्रस्तावना व संशोधन पध्दती
२. संशोधन साहित्याचा मागोवा
३. सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ाचे महत्त्व
४. सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग ाच्या अर्थिक परिस्थितीचे विश्लेषण
५. निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ सूची व परिशिष्टे

## संदर्भसूची


१. मिता पी (२००७) भारतामध्ये कृषी व्यवसाय आणि कृषी उद्योग विकास याबददल उद्योन्मुख वातावरण, संयुक्त राष्ट्रसंघाचा अन्न व कृषी संघटना, नवी दिल्ली, भारत.

२. भारत सरकार, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय (२००६-०७), वार्षिक अहवाल, नवी दिल्ली, भारत सरकार (२००८), इंडिया फूड प्रोसेसिंग उद्योग ओएसईसी बिझनेस नेटवर्क, नवी दिल्ली, भारत.

३. भारत सरकार, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय (२०११) , भारत फूड प्रोसेंसिग उद्योगासाठी धोरणात्मक योजना.

४. असोचेम (२००९), फूड प्रोसेसिंग ॲण्ड ॲगीबिझनेस , नवी दिल्ली, भारत.

५. फिक्की (२००७), प्रसंस्कृत खाद्य आणि शेती व्यवसाय विषयीची एक रिपोर्ट, भारतातील गुंतवणूकीसाठी संधी, मुंबई , भारत.

६. काचरू, आर.पी (२००६) , भारतातील एग्रो - प्रोसेसिंग इंडस्ट्रीज ग्रोथ, स्टेटस आणि संभावना, भारतीय कृषी संशोधन परिषद , नवी दिल्ली, भारत.

७. मेहता जी.एस (२०१२), उत्तर प्रदेशातील कृषी प्रक्रिया उद्योग:उद्योन्मुक संरचना आणि विकास क्षमता, गिरी इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज, लखनौ, भारत.

८. भारत सरकार, पृथ्वी विज्ञान मंत्रालय (२०११) च्या कार्यकारी सारांश सोसायटीच्या संवेदनशील गटासाठी एस ॲण्ड टी वर कार्यकारी गट अहवाल, नवी दिल्ली, भारत.

९. भुवन ए (२०१०), इंडियाज फूड इंटस्ट्र ऑन द हाय ऑप ग्रोथ इंडो एशियन न्यूज सर्व्हिस, जुरीच.

१०. भारत सरकार, राष्ट्रीय दुग्धशाळा संशोधन संस्था (२०११), आंतरराष्ट्रीय ॲनिमल इंडस्ट्री व्हिजन २०२०, फयुचर ऑफ इंडियन डेअरी इंडस्ट्री, १ डिसेबर २०११ , हरियाणा, कर्नाल.

११. भारत सरकार , राष्ट्रीय उत्पादन परिषद (२००९) , उत्पादकता आणि भारतीय उत्पादनाची स्पर्धात्मकता : अन्न प्रक्रिया क्षेत्र नवी दिल्ली, भारत

१२. सरकार एस (१९९५), शेती उद्योगाची आकार रचना : एक दुवा साधण्याचा विश्लेषण , भारतीय कृषी अर्थशास्त्र जर्नल ५०.

१३. भारत सरकार, अन्न प्रक्रिया उद्योग, मंत्रालय (२०११-१२) वार्षिक अहवाल, नवी दिल्ली, भारत.

१४. फिक्की (२०१०) फूड प्रोसेसिंग सेक्टरमधील आव्हानेवर सर्वेक्षण, मुंबई , भारत.

१५. सरकार एस, कर ए.के (२००५), ग्राम एग्रो प्रोसेसिंगची स्थिती आणि क्षमता युनिट/ उद्योग अधूनमधून ३७, नॅशनल बँका फॉर एग्रीकल्चर आणि रूरल विकास, मुंबई, भारत.

१६. भारत सरकार , उर्जा व नवीन आणि नवीकरणीय स्त्रोत (२०११), इंडियन डेअरी इंडस्ट्रीजसाठी व्हाईन पेपर कागदपत्र कर्नाल, हरियाणा, भारत

१७. भारत सरकार , सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबाजावणी मंत्रालय (२०११), वार्षिक उद्योग सर्वेक्षण, प्रमुख उद्योग समूह व्दारे प्राचार्य वैशिष्टये वर्ष २०१०-११, नवी दिल्ली, भारत.

१८. अली.एन (१९९९) पोस्ट हंगामानंतद तंत्रज्ञान आणि शेतीसाठी लागणारे महत्वपूर्ण पावडर, अध्याय -३६ मध्ये : भारत एड मध्ये सुक्या जमिनीच्या कृषी संशोधनाची पंचवीस वर्षाची नावे, एचपी, सिंग, ए.एल CRIDA, हैद्राबाद , भारतव्दारे प्रकाशित .

१९. भारत सरकार, सांख्यिकी आणि कार्यक्रम अमंलबजावणी मंत्रालय (२०१०), वार्षिक उद्योग सर्वेक्षण, वर्ष २००९-१० साठी प्रमुख उद्योग समूह प्रमुख वैशिष्टये, नवी दिल्ली. भारत

२०.. राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद (२०१०), अन्न प्रक्रिया क्षेत्रातील मानव संसाधन आणि कौशल्य आवश्यकता:२०२० पर्यंत भारतात मानवी संसाधन कौशल्य कमी करण्याच्या नकाशावर आभ्यास, नवी दिल्ली, भारत.

२१. भारत सरकार, नॅशनल मॅन्युफॅक्चरिंग कॉम्पिटिटिव्हनेस कौन्सिल (२००९), फर्म पातळीवरील स्पर्धात्मक वाढविणे भारतीय खाद्यपदार्थ व एग्रो प्रोसेसिंग उद्योग, धोरणे आणि रस्त्यांचा नकाशा विकास, नवी दिल्ली, भारत.

२२. भारत सरकार, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय (२००८), नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन , भारतातधील असंघटीत उत्पादन क्षेत्र: इनपुट, आफटपुट आणि व्हॅल्यू जोडले, एनएसएस ६२ व्या फेरी, जुलै २००५ -जून २००६, अहवाल क्रमांक ५२६ (६२/२.२/३). नवी दिल्ली, भारत.

२३. भारत सरकार, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय (२००७), नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन , भारतातील असंघटीत उत्पादन उद्योगांची कार्यप्रणालीची विशेषत, एनएसएस ६२ व्या फेरी, जुलै २००५-२००६, अहवाल क्रमांक ५२४(६२/२.२/१), नवी दिल्ली , भारत.

२४. भारत सरकार, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय (२००९), उद्योग वार्षिक सर्वेक्षण, मुख्य उद्योग सकूह प्रमुख २००८-२००९ साठी वैशिष्टयाचे, नवी दिल्ली, भारत.

२५. भारत सरकार, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय (२००५), भारतीय फूड प्रोसेसिंग उद्योगांसाठी दृष्टी धोरण.

26. http://www.indiastat.com/industries/18/industrialsectors/107700/agrobasedandfoodprocessing/ 43 / stats.aspx
27. Http://www.indiastat.com/industries/18/industrialsectors/107700/agrobasedandfoodprocessingindustries / 43 / stats.aspx